शुक्रवार, ५ एप्रिल २०२४
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २२१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 5 APRIL 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-221 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-05

## पंतप्रधान नरेंद्र मोदी आठ एप्रिलला चंद्रपुरात

### मुनगंटीवारांची प्रचारात आघाडी

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** लोकसभा 2024 च्या निवडणुकीतील पहिल्या टप्प्यातील मतदान हे 19 एप्रिलला होत असून या पहिल्या टप्प्यातील महाराष्ट्रातील सगळ्यात हॉट सीट असलेली चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निर्वाचन क्षेत्राचे भारतीय जनता पार्टी व महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे चंद्रपूरला येत असून येत्या 8 एप्रिलला मोरवा विमानतळा जवळच त्यांची भव्य जाहीर सभा होणार आहे. चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निर्वाचन क्षेत्रामध्ये भाजप विरुद्ध काँग्रेस अशी थेट लढत होणार असून चंद्रपूरचे सुधीर मुनगंटीवार यांची लढत काँग्रेसच्या प्रतिभा धानोरकर यांच्यासोबत होणार आहे. सुधीर मुनगंटीवार हे महाराष्ट्रातील एक हेवीवेट मंत्री म्हणून ओळखले जातात. मागील निवडणुकीमध्ये ही जागा भारतीय जनता पार्टीने गमावल्यामुळे सुधीर मुनगंटीवार यांच्या उमेदवारीने या जागेला प्रतिष्ठेची जागा केलेली आहे आणि म्हणून ही जागा निवडून येण्याच्या दृष्टीने भाजपातर्फे जोरदार प्रयत्न चालले आहेत . याच प्रयत्नातील एक भाग म्हणून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विदर्भातील पहिली सभा ही चंद्रपूर येथे आठ एप्रिलला होत असून या सभेत सर्व शक्तीनिशी जोरदार शक्ती प्रदर्शन व्हावे या दृष्टीने भाजप तयारीला लागले आहे. ओबीसी चेहरा म्हणून प्रतिभा धानोरकर या एका बाजूला आपली लढाई मजबूत व्हावी या दृष्टीने प्रयत्नशील असून दुसऱ्या बाजूला थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर मध्ये सभेसाठी आमंत्रित करून प्रचारामध्ये दमदार आघाडी घेतल्याचे दिसत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेमुळे एकूणच या मतदारसंघातील वातावरण बदलणार की प्रतिभा धानोरकर आपल्या जातीय समीकरणात आघाडी घेणार हे मात्र 19 तारखेला होणाऱ्या मतदारातूनच कळेल.

## मोदींनी देशाला आत्मनिर्भर केले

### देवेंद्र फडणवीस : चिखलीकरांचा उमेदवारी अर्ज दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या 10 वर्षांत गरीब कल्याण कार्यक्रम प्रत्यक्षात आणण्याबरोबरच सर्वांगीण विकास करून देशाला आत्मनिर्भर बनविले आहे. मोदी सरकारच्या सहकार्याने नांदेडसह मराठवाड्याचा चौफेर विकास करण्यासाठी भारतीय जनता पार्टी उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांना विजयी करा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेड येथे गुरुवारी केले.**



नांदेड मतदारसंघातील भाजपाचे उमेदवार प्रतापराव पाटील - चिखलीकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्याकरीता आयोजित विजय संकल्प सभेत ते बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, खा. अशोक चव्हाण, राज्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, खा. डॉ. अजित गोपछडे तसेच भाजपाचे आमदार, महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

नांदेड मधून प्रतापराव पाटील – चिखलीकर यांनी मागच्या निवडणुकीत काँग्रेसमध्ये असलेल्या अशोक चव्हाण यांना मात दिली होती. मात्र यंदा ते भाजपाचे राज्यसभेतील खासदार असल्याने याबाबतचा विशेष उल्लेख श्री. फडवणीस यांनी केला. खा. अशोक चव्हाण यांच्या साथीने प्रतापरावांना बुस्टर डोस मिळाल्याचे नमूद करत त्यांना यंदा 50 टक्क्यांच्या पेक्षा अधिक मते मिळतील असा विश्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.


प्रतापराव चिखलीकर यांचे मतदार संघातील कार्य हे विकासाचेच कार्य राहिले आहे. अशोकरावांनीही विकासासाठीच मोदीजींना पाठिंबा दिला. पक्षानेही नेहमीच विकासाचा अजेंडा राबविला आहे, असे फडणवीस यांनी नमूद केले.

यावेळी फडणवीस यांनी मोदी सरकारच्या कामगिरीचा आढावा घेतला. ते म्हणाले की, कोरोना प्रतिबंधक लस तयार करणारा भारत शस्त्रे-क्षेपणास्त्र, अंतराळ यान याबाबत पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली स्वयंपूर्ण झाला. गेल्या 75 वर्षात ज्यांच्या घरात पाणी नव्हते त्या 50 कोटी जनतेच्या दारात पाणी पोहोचविण्याचे काम मोदीजींनी केले. देशातील निम्मी लोकसंख्या – महिला गेल्या 10 वर्षात मुख्य प्रवाहात आल्या.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यावेळी म्हणाले की, लोकप्रतिनिधी म्हणून अहोरात्र झटणारा प्रतापराव हा देशातील एक निराळा खासदार आहे. आपल्या भागातील विकासासाठी सरकारदफ्तरी पाठपुरावा करणारे चिखलीकर जनतेसाठी कायम उपलब्ध असणारे नेतृत्व आहे. खा. अशोक चव्हाण म्हणाले की, प्रतापराव आणि मी एकेकाळी एकत्र काम केले आहे. नरेंद्र मोदीजींच्या विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नांदेडशी संबंधित पाच खासदारांची वज्रमूठ आहे. मोठा बंधू म्हणून मी स्वतः प्रतापरावांबरोबर आहे, अशी ग्वाहीही खा. चव्हाण यांनी दिली.

## बीडमधून बजरंग सोनवणे यांची उमेदवारी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** आगामी लोकभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार गटाकडून लोकसभा उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये दोन उमेदवारांचा समावेश आहे. त्यानुसार बीडमधून बजरंग सोनावणे तर भिवंडीतून सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्यामामा यांना लोकसभेची उमेदवारी देण्यात आली आहे. दुसऱ्या यादीत दोनच नावं आहेत. याआधी पहिल्या उमेदवार यादीत शरद पवार गटाने 5 उमेदवार जाहीर केले होते. आता नव्याने दोन उमेदवारांची दुसरी यादी शरद पवार गटाने जाहीर केली आहे. बीड लोकसभा मतदारसंघातून शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळवण्यासाठी ज्योती मेटे आणि बजरंग सोनावणे हे दोघेजण इच्छूक होते. मात्र, बजरंग सोनावणे यांनी गेल्या निवडणुकीत पंकजा मुंडे यांना चांगली टक्कर दिली होती. ज्योती मेटे यांच्यापेक्षा बजरंग सोनावणे यांच्याकडे निवडणूक लढवण्यासाठी असलेली यंत्रणा आणि क्षमता हे निकष लक्षात घेता शरद पवार गटाने बजरंग सोनावणे यांना बीडमधून उमेदवारी देऊ केली आहे. बीडमध्ये आता पंकजा मुंडे विरुद्ध बजरंग सोनावणे अशी लढत रंगेल. तर भिवंडी लोकसभा मतदारसंघ काँग्रेस आणि शरद पवार गटापैकी कोणाच्या वाट्याला येणार, यावरुन वाद सुरु होता. यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये भिवंडीतून काँग्रेसच्या उमेदवाराला लक्षणीय मतं पडली होती. त्यामुळे काँग्रेस पक्ष भिवंडी मतदारसंघावरील दावा सोडायला तयार नव्हता. मात्र, या निवडणुकीत शरद पवार गटाकडे सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्यामामा यांच्यासारखा तगडा उमेदवार असल्यामुळे ही जागा आपल्यालाच मिळावी, असा शरद पवार गटाचा आग्रह होता. भाजपचे विद्यमान खासदार कपिल पाटील यांना कडवी टक्कर देण्यासाठी बाळ्यामामा योग्य उमेदवार असल्याची अनेकांची भावना आहे. त्यामुळेच शरद पवार गटाने सुरेश म्हात्रे यांना रिंगणात उतरवले आहे. त्यामुळे आता कपिल पाटील आणि बाळ्यामामा यांच्यातील लढाईत कोण बाजी मारणार, हे आता पाहावे लागेल.

## आधुनिक अनाजी पंतांनी आमचे घर फोडले

### राष्ट्रवादीचे युवा नेते रोहित पवार यांचे रोखठोक प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** महाविकास आघाडीचे बुलढाणा मतदार संघातील उमेदवार नरेंद्र खेडेकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आयोजित सभेत बोलताना रोहित पवार यांनी भाजप, केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. संतांच्या, छत्रपती शिवाजी, संभाजी महाराजांच्या काळातही अनाजी पंत सक्रिय होते आणि आजही आहेत. आधुनिक अनाजी पंतांनी आमचेही घर फोडले, तीनचार पवार तिकडे गेले. त्यांनी लक्षात ठेवावे की, त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस आणि पवार कुटुंबीय यांच्यावर काहीच परिणाम होणार नाही. याचे कारण अख्खा स्वाभिमानी राज्यवासी हा शरद पवारांचा परिवार आहे, असे रोखठोक प्रतिपादन राष्ट्रवादीचे युवा नेते रोहित पवार यांनी येथे केले.

यावेळी ठाकरे गटाचे आदित्य ठाकरे, अंबादास दानवे, सुषमा अंधारे, उमेदवार नरेंद्र खेडेकर, जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत यांच्यासह आघाडीचे स्थानिक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते. यावेळी पुढे बोलताना पवार यांनी, पवार परिवार फोडण्यात 'ते' काहीसे सफल झाले असले तरी भाजप सोबत गेले कोण? तर मूठभर नेते गेले. (लवकरच) पडणारे नेते गेले. आमच्या (राष्ट्रवादी) सोबत असलेले नेते निष्ठावान, लढणारे अन जिंकणारे आहेत, हे त्यांनी ध्यानात ठेवावे.

## आज चंद्रपूर शहरात राहणार तीव्र उष्णतेची लाट

### हवामान विभागाचा यलो अलर्ट, नागरिकांना सतर्कतेचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

प्रा. श्याम हेडाऊ

**चंद्रपूर :** हवामान विभागाच्या अंदाजानुसार, उद्या दि. 5 एप्रिल रोजी चंद्रपूर शहरात दिवसा तसेच रात्रीही उष्णतेची लाट राहणार असुन याबाबत यलो अलर्ट देण्यात आला आहे.यंदा एप्रिल महिन्याच्या सुरवातीलाच प्रचंड उकाडा जाणवू लागला असुन सर्वांना उष्णतेच्या झळा सोसाव्या लागत आहेत. त्यामुळे उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यास सतर्क राहण्याचा इशारा चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे देण्यात येत आहे. तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर आयुक्त विपीन पालीवाल यांच्या मार्गदर्शनात व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.वनिता गर्गेलवार यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणात मनपा आरोग्य विभागामार्फत उष्माघात कृती आराखडा राबविण्यात येत असुन उष्माघाताचा धोका टाळण्यास विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. तीव्र उन्हात नागरिकांनी शक्यतो दुपारी 12 ते 4 या वेळेत बाहेर पडणे टाळावे, घर थंड राहण्यास नागरीकांनी कुल रूफ टेक्नोलॉजीचा वापर करावा म्हणजेच उष्णतारोधक रंग जर घराच्या छतावर लावले तर 2 ते 3 डिग्री तापमान कमी होण्यास मदत मिळते. उष्माघातामुळे निर्माण होणाऱ्या आपातकालीन परिस्थितीप्रसंगी रुग्णवाहिकेला बोलाविण्यास 108 क्रमांकही उपलब्ध करून देण्यात आला आहे. ट्रॅफीक सिग्नलवर नागरीकांना अधिक काळ उभे राहावे लागु नये याकरीता 12 ते 3 या कालावधीत ट्रॅफीक सिग्नल बंद ठेवण्याच्या सुचना वाहतुक विभागाला देण्यात आल्या आहेत. मनपा क्षेत्रातील उद्याने सकाळी 9 ते रात्री 9 वाजेपर्यंत सुरु ठेवण्यात येऊन नागरिकांना सावलीचा आश्रय मिळेल याची व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच उष्माघाताचा धोका टाळण्यास नागरीकांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय येथील ' शीत वार्ड ' ची व्यवस्था करण्यात आली आहे.



**उष्माघाताची लक्षणे :** अस्वस्थपणा, थकवा येणे, शरीर तापणे, अशक्तपणा, अंगदुखी, डोकेदुखी, मळमळणे ही लक्षणे आढळल्यास थंडगार पाण्याने अंघोळ करावी . ( गार पाण्याने अंघोळ केल्याने तापलेले शरीर थंड होण्यास मदत होते ) थंड जागेत आराम करावा, परिश्रमाचे काम करू नये, भरपूर थंड पाणी प्यावे, तसेच मनपा आरोग्य केंद्रात किंवा जिल्हा सामान्य रुग्णालयात त्वरित औषधोपचार करवून घ्यावा .

**तीव्र उन्हात काय करावे व काय करू नये**

- यलो अलर्टच्या कालावधीमध्ये भर उन्हात म्हणजे साधारणत : दुपारी 12 ते 4 वाजेपर्यंत उन्हात जाणे टाळावे .
- सौम्य रंगाचे आणि सुटसुटीत कपड्यांचा वापर या दिवसांमध्ये करावा .
- उन्हामुळे फार घाम येत असल्याने शरीरातील पाण्याचं प्रमाण कमी होतं, ते कायम राखण्यासाठी या दिवसांमध्ये अधिक पाणी प्या .
- दारु, चहा, कॉफी, सोडा असणारी शीत पेयांचं सेवन टाळा . या पदार्थांमुळे
- शरीरातील पाण्याचं प्रमाण कमी होतं .
- घरगुती पेय ज्यामध्ये लस्सी, ताक, लिंबूपाणी, तोरणी ( तांदळाचं पाणी ),आंब्याचे पन्हे, नारळ पाणी यासारख्या गोष्टींची सेवन केल्यास डिहायड्रेशन होत नाही .
- डोक्यावर टोपी किंवा स्कार्फ किंवा रुमाल बांधावा . उन्हात डोकं उघडं राहणार नाही याची काळजी घ्यावी .
- लहान मुलं, वयस्कर व्यक्ती तसेच आरोग्य विषयक समस्या असणाऱ्यांची विशेष काळजी या दिवसांमध्ये घ्यावी .
- थंड जागेत, वातावरणात राहावे तसेच थंड पाण्याने अंघोळ करावी .
- शिळे अन्न व उच्च प्रथिने असलेले पदार्थ खाणे टाळावे उन्हात प्रवास करताना डोळ्यांना गॉगल लावा, टोपी, छत्री यांचा वापर करावा .






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

काही गाणी आणि त्यांचं संगीत मनाला स्वर्गीय अनुभूती देणारं असतं . ज्ञानेश्वर माऊलींचं ' मोगरा फुलला ' हे असंच भक्तिगीत. मनाला एका वेगळ्या वातावरणात घेऊन जाणारं . संगीत मन को पंख लगाये अशी ओळ एका हिंदी गाण्यात आहे. खरंच अशी गाणी आपल्याला पंख लावून त्यांच्या सुरांवर अलगद तरंगत दूरवर घेऊन जातात. ' मोगरा फुलला ' हे शब्द कानावर पडले की आठवतो तो लतादीदींचा सूर. गाण्यात असलेली ती बासरीची मधुर सुरावट . हृदयनाथांचं संगीत अन लतादीदींचा सूर.. ! जणू गंगायमुनेचा संगमच ! आणि त्रिवेणी संगमात अदृश्य असलेली तिसरी सरस्वती म्हणजे माऊलींची प्रासादिक रचना. मग अजून काय हवे ? कान तृप्त होणारच. इंद्रियांना तृप्तीचा अनुभव येणारच.

गहिनीनाथांनी निवृत्तीनाथांना अनुग्रह दिल्यानंतर निवृत्तीनाथांनी ज्ञानेश्वरांची आपला शिष्य म्हणून निवड केली आणि त्यांना अनुग्रह दिला. जणू ' इवलेसे रोप लावियले दारी. ' पण हे मोगऱ्याचे इवलेसे रोप इतके वाढले, इतके वाढले की त्याचा वेल गगनापर्यंत पोहोचला. ज्ञानेश्वरांना आत्मानुभव आला. त्यांचे व्यक्तिमत्व इतके व्यापक झाले की जणू गगनाला पोहोचले. विश्वात्मक देवाशी ते एकरूप झाले. निवृत्तीनाथांनी लावलेल्या या इवल्याशा रोपाला इतका बहर आला की खाली पडलेली फुले वेचत नाही तोपर्यंत झाड कळ्यांनी पुन्हा बहरून आले आणि पुन्हा फुलांचा वर्षाव जमिनीवर झाला. असा निवृत्तीनाथांच्या कृपेचा वर्षाव ज्ञानदेवांवर झाला. आणि ती कृपा म्हणजे जणू मोगऱ्याचा दैवी सुगंध. त्या सुगंधाने आकाश आणि दशदिशा भरून गेल्या. ही आपल्या गुरूंची कृपा झाल्यावर ज्ञानदेवांनी आपले मन एकरूप करून जणू त्याचा गुंफलेला शेला त्या रुखमादेवीवराला म्हणजेच विठ्ठलाला अर्पण केला.हे गीत गाताना लतादीदींना आलेला अनुभव त्यांच्याच शब्दात ऐकू या. त्या म्हणतात, ' मोगरा फुलला ही ज्ञानेश्वरांची रचना गाताना मला माझे वडील आम्हा भावंडांकडे बघताहेत असा भास झाला.






## आनंदी पहाट


## अंतर्मनाच्या मूलभूत गरजा व्यक्त होण्यातून पूर्ण होतात

आधुनिक केसरी

अनेकांकडून केवळ शरीरासाठीच सर्वकाही केले जात असते. परंतू आपल्या मनाचा, मनातल्या मनात, मनमुरादपणे किंवा मनमारून, मनपसंद असा कधी विचार देखील केला जात नाही. मनंच आपल्याला जगायला शिकवत असते, मनंच आपल्याला पदोपदी अनेकविध निरनिराळ्या प्रसंगांची अनुभूती देत असते. दुसऱ्याच्याच काय पण आपल्या स्वतःच्या मनाचा सुद्धा थांग पत्ता लागणे मुश्कील असते. आपल्यापैकी प्रत्येकजण दिवसाची रात्र, रात्रीचा दिवस करून दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यासाठी धडपडत असतो. सद्यःस्थितीत आपल्या मुलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी सर्वप्रथम अर्थार्जन अनिवार्य झाले आहे. तसे बघितले तर अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीनही मुलभूत गरजांची पूर्तता शरीरासाठीच होत असते. पण मनाचे काय? ते दिसत नसले तरीही असतेच. आपल्या जगण्यापलीकडच्या जीवनाला मनामुळे आपले आयुष्य वेगळे असल्याची प्रचीती येत असते. आपल्या शरीरावर ताबा ठेवून त्याला आपण स्थिर करू शकतो, पण मनावर नियंत्रण ठेवणे मोठे कठीण काम असते. काहीजणांमध्ये स्वमग्नतेचे प्रमाण अलीकडच्या काळांत अधिक दिसून येत आहे. ह्याचा निश्चितच थेट संबंध आपल्या अंतर्मनाशी असतो. मनाचा विचार न करता केवळ कोणत्यातरी अनावश्यक बाबींचा अनावधानाने विचार करणे ह्यामध्ये सुरु होत असते. काही प्रमाणांत अशी व्यक्तीआत्मकेंद्रित झाल्याचा आपल्याला प्रत्यय येऊ लागतो. अशा व्यक्तींच्या अंतर्मनांत सुरु असलेल्या वैचारिक प्रक्रियेत अनाठायी विचारांचा कल्लोळ माजलेला असतो. त्यांच्या शरीर आणि मन ह्याचा मिलाफ होणे शक्य होत नाही. अनेकदा ह्या स्वमग्नतेमुळे स्वतःच्या अस्तित्वाची देखील जाणीव रहात नाही.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## श्वसाचा मालक | विश्वंभर ||

कर्म ज्ञान भक्तीची | करू नको थट्टा ||
लावु नको बट्टा | कुळाला तू ||१||
ज्ञाना-तुका सांगे | त्रिसूत्री मुक्तीची ||
जाण जगण्याची | हीच रीत ||२||
मृगजळ नदीचा | सापडे का घाट ? ||
हाती फलकट | येते जाण ||३||
आभासी जगणे | सत्ता प्राप्ती होता ||
दुःख भाळी येता | कोण तुझे ? ||४||
करावा विचार | सारासार एक ||
श्वासाचा मालक | विश्वंभर ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज



पुष्प
३३वे



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे,
दिंडोरी (नाशिक)

### श्री स्वामी समर्थ सेवामार्ग


इतरांच्या जीवनात आनंद फुलवणे सर्वत्र सुख-शांती नांदण्यासाठी अध्यात्म जागवणे, हा या सेवा मार्गाचा हेतू आहे. निरपेक्ष सेवा, संघटित उपासना, सहभाव, सामूहिक जनकल्याणाचे अभियान, सर्वसमानता, विनामूल्य मार्गदर्शन व प्रबोधन, साधेपणा व जिव्हाळा, ठायी-ठायी ज्ञानाच्या पाणपोया, राष्ट्रकल्याणाची उर्मी, ग्रामोद्धार, स्वावलंबन, महिलांना आदर, अग्रक्रम व समान सहभाग, सर्व केंद्रातून सामंजस्य, ऐक्य व लोककल्याण, इत्यादी या मार्गाची वैशिष्ट्ये आहेत. जनहितोपयोगी ज्ञान व शास्त्रांचे पुनरुज्जीवन, संशोधन या मार्गाने केले आहे. सांस्कृतिक तत्त्वांना उजाळा व कृतिशीलता देऊन कुटुंब व्यवस्था ऊर्जस्वित बनवण्याचे अभियान मार्गाने यशस्वी केले आहे. समाजजीवनाचा नैतिक पाया संस्कारांनी भक्कम करून शील, चारित्र्य उत्तम घडवण्याची किमया येथील सेवेत आहे. प्रत्येक क्षणी श्री स्वामी महाराजांच्या इच्छेनुसार, मार्गदर्शनानुसार या मार्गाची वाटचाल होते आहे. म्हणून दिंडोरी मार्ग सर्वहितकारी, सहज प्रचिती करून देणारा मार्ग आहे. श्री स्वामी महाराजांना भूषणावह होतील असे आचार-विचार करायला लावणारा हा मार्ग एकनिष्ठा व आत्मशुद्धीचा मार्ग आहे. हा मार्ग संतांच्या उपदेशांचे शाश्वत सार अनुभवायला देणारा मार्ग आहे. संत तुलसीदास सांगतात - “जाने बिनु नं होई परतीती। बिनु परतीती होई नहिं प्रीती। प्रीती बिनु नहिं भगति दिढाई॥” सत्यज्ञानावाचून प्रचिती येत नाही, प्रचितीशिवाय भगवद् प्रेमाची व्याकुळता नाही, या भगवद् अनुरक्तिवाचून भक्ती दृढ, सबळ होत नाही. श्री स्वामी महाराजांची सेवा याच सोपानाने अनुभवण्याचा सहज सोपा मार्ग दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा, अध्यात्म मार्ग आहे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

निज स्वरुप के अन्तरे,
अनुभव शब्द प्रकाश ।
दशो दिशा परिपूर्ण है, तुरियातीत विकाश
।।३५।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/३५

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
आत्मस्वरूपाचा प्रकाश उदय झाल्यावर, जेव्हा आत्म्याला दशदिशांत शब्द प्रकाशाचा (परब्रह्माचा प्रकाश) परिपूर्ण अनुभव होतो, त्या अवस्थेला तुरियातीत अवस्था म्हणतात. जेव्हा जीवात्म्यात ब्रह्म प्रकाश, परमानंदाची धारा प्रवाहित होऊ लागते, याला तुरियातीत अवस्था म्हणतात.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज


.........................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## नाम आणि सत्कर्म

आधुनिक केसरी

नाम हा सत्कर्माचा पाया आहे तसाच कळसही आहे. भगवंताच्या स्मरणात केलेले कर्मच सत्कर्म या सदरात पडू शकते; भगवंताच्या विस्मरणात केलेले कर्म सत्कर्म ठरू शकत नाही. समजा, एखादा मनुष्य नुसते तोंडाने ‘ राम, राम ’ म्हणतो आहे परंतु भगवंताच्या स्मरणात नाही, तर मग ‘ राम, राम ’ म्हणण्याची त्याची क्रिया सत्कर्म म्हणता येईल का ? वास्तविक, नाम हे स्वतःसिद्ध असल्याने ते जाणता वा अजाणता म्हटले तरी ते सत्कर्म याच सदरात पडते, कारण ‘ जेथे माझे नाम तेथे मी पुरुषोत्तम ’ असे भगवंताचेच वचन आहे. म्हणून नामाचा उच्चार आणि भगवंत या दोन गोष्टी निराळ्या असूच शकत नाहीत. मुखाने नाम म्हणणाऱ्याचे लक्ष भगवंताकडे असो वा नसो, ते सत्कृत्य याच सदरात पडते. इतर कर्मे आणि नाम घेण्याचे कर्म यांत जो मोठा फरक आहे तो हाच की, इतर कर्मांना पूर्णत्व किंवा सत्यत्व नामाने येते, तर उलटपक्षी नाम आणि अपूर्णत्व या गोष्टी एकत्र संभवतच नाहीत. म्हणून नाम भगवंताच्या स्मरणात घेतले किंवा कसे हा प्रश्नच उद्भवत



नाही. किंबहुना, नाम मुखी आले की सत्कर्मे होऊच लागतात. मूल झाले की मुलाच्या आईला पान्हा फुटणे, मुलाचे लाड करणे, त्याच्यावर सर्वतोपरीने प्रेम करणे, या गोष्टी जशा न शिकविता सहजच होतात, तशीच स्थिती नाम घेणाऱ्याची सत्कर्माच्या बाबतीत होते. इतकेच नव्हे तर, त्या आईला जर म्हटले की तू मुलाला जवळ ठेव, पण त्याच्यावर प्रेम वगैरे काही करू नकोस, तर ते जसे तिला शक्य नाही, त्याचप्रमाणे नाम घेणाराला सत्कर्मे टाळू म्हटले तरी टाळता येणार नाहीत. सत्कर्मे फळाला आली असे केव्हा म्हणता येईल, तर भगवंताचे नाम मुखी येईल तेव्हाच. परमात्म्याने आपल्याला सांगून ठेवले आहे की, ‘‘ तू माझा व्हावास असे तुला वाटते आहे ना ? मग तू प्रपंच अती दक्षतेने कर, प्रयत्नाला कधी मागे पाहू नकोस, पण फळ देणारा मी आहे ही भावना ठेवून तू वाग. जी परिस्थिती येईल त्यात समाधान बिघडू देऊ नकोस, आणि मी जे सांगतो ते औषध घे, ते तुला सर्व रोगांतून मुक्त करील; आणि ते औषध जर कोणते असेल तर ते माझे ‘ नाम ’ हे होय. ’’ त्या नामाचा खरोखर तुम्ही अभ्यास करा. तुम्ही सर्वांनी असा निश्चय करा, की नामाशिवाय जगणे हे खरे नाही. नामाशिवाय जगू नये असे मला खरोखर मनापासून वाटते. नामावरची निष्ठा कसे काम करते हे निष्ठेने नाम घेणारालाच कळेल. नामाचे प्रेम ज्याला लागले त्याच्या मागे परमात्मा उभा राहिला हे अगदी सत्य, सत्य, त्रिवाचा सत्य सांगतो. म्हणून आवडीने आणि प्रेमाने भगवंताचे नाम घ्या, एकदा तरी त्याला कळकळीने ‘रामा! ’ अशी हाक मारा, की भगवंताला तुम्हाला येऊन भेटावेसे वाटले पाहिजे.

## निरूपण

आधुनिक केसरी

आतां आदिभूतिक तो कोण । सांगिजेल ॥ १ ॥
श्लोक ॥ सर्वभूतेन संयोगात् सुखं दुःखं च जायते ।
द्वितीयतापसंतापः सत्यं चैवाधिभौतिकः ॥
सर्व भूतांचेनि संयोगें । सुखदुःख उपजों लागे ।
ताप होतां मन भंगे । या नांव आदिभूतिक ॥ २॥
तरी या आदिभूतिकाचें लक्षण । प्रांजळ करूं निरूपण ।

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, ५ एप्रिल २०२४

adhunikkesari.com


# वंचितची निवडणुकीतील भूमिका भाजपाला अनुकूल

## डॉ. भालचंद्र मुणगेकर : प्रकाश आंबेडकरांची भूमिका लोकशाही, संविधान विरोधात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकसभेची सध्याची निवडणूक देशाच्या लोकशाहीच्या रक्षणासाठी अत्यंत निर्णायक आहे. ती भारतीय जनता पक्ष विरुद्ध इंडिया आघाडी अशी नसून नव फॅसिस्ट शक्ती विरोधातील निवडणूक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका हिटलरविरोधी आणि लोकशाहीच जनतेला खरा न्याय देऊ शकते अशी होती. या विचारांच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीच्या प्रकाश आंबेडकर यांनी भूमिका घेतली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याची प्रकाश आंबेडकरांची भूमिका दुर्दैवी असून ती भाजपाला अनुकूल ठरणारी आहे, असे काँग्रेस नेते माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी म्हटले आहे.

डॉ. भालचंद्र मुणगेकर गांधी भवन येथे पत्रकार परिषदेत बोलत होते, ते पुढे म्हणाले की, ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सुरुवातीपासून भाजपाच्या भूमिकेवर टीका केली होती. भाजपा संविधान विरोधी आहे, लोकशाही विरोधी आहे अशी भूमिका ते मांडत होते परंतु प्रत्यक्षात लढण्याची वेळ आली त्यावेळी त्यांनी भाजपला अनुकुल भूमिका घेतली. महाविकास आघाडीसोबत जागा वाटपाची चर्चा केली परंतु शेवटी वेगळे लढण्याचा निर्णय घेतला. वंचित आघाडीला २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ४४ लाख मते पडली होती पण त्यात एमआयएमच्या मतांचा मोठा हिस्सा त्यात होता. विधानसभा निवडणुकीत एमआयएम सोबत नसल्याने वंचितच्या मतांमध्ये घसरण होत ही मते २१ लाखापर्यंत खाली आली. विधानसभा



व लोकसभेत वंचितचा एकही उमेदवार विजयी झाला नाही. लोकसभा निवडणुकीत वंचितमुळे काँग्रेस आघाडीचा ९ जागांवर पराभव झाला तर विधानसभा निवडणुकीत १६ जागांवर पराभव झाला परंतु वंचितमुळे भाजपाच्या एकाही उमेदवाराचा पराभव झालेला नाही. यावरून वंचितची भूमिका ही भाजपाला फायदेशीर अशीच ठरलेली आहे. यावेळी जागा वाटपाच्या सुरुवातीलाच त्यांनी प्रत्येक पक्षाला १२ जागा द्याव्यात यापासून सुरुवात केली होती. प्रकाश आंबेडकर यांनी सातत्याने टीकात्मक विधाने करूनही काँग्रेस पक्षाने त्यांना अत्यंत सन्मानाने १७ मार्च रोजीच्या शिवाजी पार्कवरील इंडिया आघाडीच्या जाहीर सभेला निमंत्रीत केले. पण त्यासभेत त्यांनी केलेल्या विधानावरून त्यांची भूमिका साशंक आहे हे स्पष्ट झाले होते. प्रकाश आंबेडकरांची एकूण भूमिका पाहता त्यांना खरेच महाविकास आघाडीबरोबर आघाडी करायची होती का, असा प्रश्न उपस्थित होतो.

भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जीवाचे रान करून बनवलेले संविधानच मान्य नाही. सरसंघचालक गोलवलकर यांनी संविधानचा 'गोधडी' असा उल्लेख केला होता. प्रकाश आंबेडकर यांच्या भूमिकेमुळे बौद्ध समाजात तीव्र नाराजी असून लोकशाही, संविधान व स्वांतत्र्य वाचवण्यासाठी दलित, वंचित, आदिवासी, अल्पसंख्यांक, महिला, मागासवर्गीय या सर्व समाज घटकांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मरण करून इंडिया आघाडीला मतदान करावे असे आवाहन डॉ. मुणगेकर यांनी केले आहे.



# देशात विरोधकांना संपवून हुकूमशाही आणण्याचा भाजपचा डाव

## विरोध पक्षनेते विजय वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज

**नागभिड :** देशांतील प्रत्येक नागरिकांला समान हक्क व जगण्याचा अधिकार मिळावा यासाठी भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांनी लोकशाही पुरस्कृत संविधान लिहून देशाला उत्तम घटना दिली. माञ सध्याच्या केंद्रातील मनुस्मृति विचारांचे सरकारने देशांतील नागरिकांची लूट करुन, धर्मांधतेच्या नावावर दिशाभूल करीत व्यापारी हित जोपासून देशाच्या नागरिकांचे रक्षण कवच असलेल्या पवित्र संविधान पूर्णतः बदलण्याचा प्रयत्न चालविला आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपला रोखले नाही तर स्वतंत्र भारताचे गुलाम म्हणुन जगावे लागेल.हि अंतीम निवडणुक समजून हुकूमशाही आणू पाहणाऱ्या भाजपा सरकारला सत्तेतून हद्दपार करा असे प्रतिपादन राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले. ते गडचिरोली - चिमूर लोकसभा क्षेत्राचे इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. नामदेव किरसान यांचे प्रचारार्थ नागभिड येथे आयोजीत सभेत बोलत होते.

आयोजीत प्रचार सभेस प्रमूख अतिथी म्हणून माजी आमदार डॉ. अविनाश वारजुरकर , इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ नामदेव किरसान, माजी जिल्हा परिषद सदस्य पंजाबराव गावंडे, काँग्रेस अनु. जाती सेल जिल्हाध्यक्ष प्रफुल खापर्डे, हसन गिलानी,,काँग्रेसचे चीमुर विधानसभा समन्वयक डॉ.सतीश वारजुरकर, ओबीसी प्रदेश संघटक धनराज मुंगले, ॲड. गोविंद भेंडारकर, नरेंद्र हेमने, डॉ.कावळे , मंगेश सोणकुसरे, भास्कर शिंदे, डॉ. रघुनाथ बोरकर, विनोद बोरकर, खोजराम मरस्कोल्हे, साहिस वारजुरकर प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. पुढें बोलताना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, देशांतील शेतकरी, कामगार, युवक नोकरदार वर्ग व सर्व नागरीक मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले आहेत. महागाई, बेरोजगारी, खाजगीकरण यामुळे अगोदरच जनतेचे कंबरडे मोडले असुन आता विरोध करणार्या विरोधकांना संपविण्याचा डाव आखला जात आहे. खते, जीवनावश्यक वस्तू, पेट्रोल, डिझेल, गॅस यात प्रचंड दरवाढ व जीएसटी च्या माध्यमातून जनतेची लूट केल्या जात आहे. अश्या निष्ठूर सरकार विरुद्ध आता पेटून उठून देशातील संविधान टिकविण्यासाठी इंडिया आघाडीच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे. देश सुरक्षित नाही, देशांतील महीला सुरक्षित नाही, महीला खेळाळूचे शोषण करणारे मोकाट फिरत आहे. अशी अवस्था देशाची झाली आहे.तर विद्यमान खासदार अशोक नेते हे संसदेत मौन धारण करून बसतात अश्या मौनी बाबाला उत्कृष्ट संसद पटू पुरस्कार देतात हि हास्यास्पद बाब असल्याची टीका विरोध पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी यावेळी केली. तर देशातील भाजप सरकार हे आदिवासी, शेतकरी, कामगार, युवक विरोधी सरकार असुन देशाच्या शेतकऱ्यांना आजवर हमीभाव दिला नाही. . देशांत तानाशाही सुरु असुन पक्ष फोडल्या जात असल्याचे माजी आ. डॉ. अविनाश वारजुरकर यांनी यावेळी सांगितले. देशात सत्तापीपासून्नी बहुजनांना धर्म जातीमध्ये विभागून तसेच स्वतःचा पराभव दिसताना पुलवामा सारखे कांड घडवून निष्पाप सैनिकांचा बळी घेतल्याचे व त्यातून सत्ता काबीज केल्याचे पाप केले गेले आहे. अशा निष्ठावर निर्णय सरकारला अर्ज पार करण्यासाठी मला सेवेची संधी द्यावी, असे प्रतिपादन इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. नामदेव कीरसान यांनी केले. तत्पूर्वी राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते गडचिरोली - चिमूर लोकसभेचे इंडिया आघाडीचे उमेदवार डॉ. नामदेव कीरसान यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी नागभिड तालुक्यांतील व परिसरातील हजारो नागरिकांची उपस्थिती होती.

# सीए रिजवाना शेख राष्ट्रीय नारीशक्ती पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि रेडियंट एक्सलन्स अवॉर्डने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या प्रतिभा आणि बुद्धिमत्तेद्वारे असामान्य कार्य करणाऱ्या महिलांना "नारीशक्ती पुरस्कार" देऊन त्यांचा विक्रम प्रस्थापित करून त्यांना पुरस्कार देण्याचे काम केले आहे. 2030 पर्यंत आंतरराष्ट्रीय मार्गदर्शित शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वचनबद्धता आणि 'विकसित भारत' या संकल्पनेचे तत्त्वनिष्ठ पालन हे रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्सच्या पुरस्कार श्रेणीचे मार्गदर्शन करते. वर्ल्ड सेव्हन वंडर्स पब्लिकेशन्स आणि नॅशनल कौन्सिल फॉर इन्स्पिरेशन अँड डेव्हलपमेंटद्वारे संचालित रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्स, आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत नोंदणीकृत, हा रेकॉर्ड आणि सजावट अंतर्गत प्रकाशित करण्यात आली आहे.

हे रेकॉर्ड आणि सजावट भारत आणि आशियाई देशांमध्ये आयोजित केलेल्या विविध समारंभांमधून देखील प्राप्त केली जाते. रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्सच्या या पुरस्कार श्रेणीमध्ये देशातील विविध राज्यपाल, पद्मश्री विजेते, कुलगुरू, भारतीय लष्कर आणि हवाई दलाचे अधिकारी, साहित्यिक, अभिनेते आणि नामवंत खेळाडू आणि व्यक्ती यांचा गौरव करण्यात आला आहे. अलीकडे, रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्सच्या समान पुरस्कार श्रेणीचे भारत सरकारच्या G-20 सचिवालयाच्या संचालकांच्या स्तरावर आणि भारताच्या राज्यपालांनी कौतुक केले आहे. महत्त्वाचे म्हणजे वर्ल्ड सेव्हन वंडर्स प्रकाशनाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय विक्रमही प्रस्थापित झाले आहेत. त्यामुळे, देशभरातील आणि जगभरातील या विक्रम आणि सजावटीमध्ये स्वारस्य असलेल्यांनी, त्यांच्या असामान्य प्रतिभा, कौशल्य आणि बुद्धिमत्तेचे प्रदर्शन करून, या पुरस्कार श्रेणीसाठी "उत्कृष्टता पुरस्कार" आणि "नारीशक्ती पुरस्कार" च्या रेडियंट टॅलेंट बुकमध्ये नोंदणीसाठी अर्ज सादर केले आहेत. या अनुषंगाने नुकत्याच झालेल्या एका भव्य समारंभात रॅमन मॅगसेसे आणि पद्मश्री पुरस्कार विजेत्या नीलिमा मिश्रा यांच्यासह वर्ल्ड सेव्हन वंडर्स पब्लिकेशन आणि रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्स या आंतरराष्ट्रीय विक्रम लेखक आणि भारत सरकारच्या संस्थापक मुख्य संपादक उपस्थित होत्या.

महाराष्ट्रातील अमरावती शहरात. डॉ. क्रांती महाजन, जगप्रसिद्ध निसर्गोपचार आणि NCID च्या संचालक, मुख्य शिक्षक ज्युरी आणि NCID चे संचालक, डॉ. एस. पद्मश्री पुरस्कारासाठी नामांकित. देवेंद्र आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. गुरतेज सिंग ब्रार (पंजाब), डॉ. विजय वधई (पुणे), शांतता दूत श्री. समीर शेंडे, सामाजिक कार्यकर्ते श्री. रवींद्र वैद्य, श्री. यशवंत कुर्वे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी औरंगाबाद, महाराष्ट्र येथील रहिवासी तरुण चार्टर्ड अकाउंटंट (सीए) रिजवाना शेख यांना तिच्या अद्भुत प्रतिभा आणि अपवादात्मक बुद्धिमत्तेची दखल घेऊन "नारी शक्ती पुरस्कार - 2024" देऊन सन्मानित केले. मूलभूत संघर्षातून बाहेर पडत रिझवाना शेख यांनी नुकतीच चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षा उत्तीर्ण केली, त्यामुळे हे गुण लक्षात घेऊन सीए रिजवाना शेख यांना 'नारीशक्ती पुरस्कार' हा राष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला. या प्रसंगी, NCID आणि RTBR ने रिझवाना शेखला पुरस्कार हक्क आयडी (NCID/NSA-24/026), हे आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड डेकोरेशन प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह सुवर्ण पदक आणि सदस्यत्व देऊन सन्मानित केले. त्यामुळे महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात अप्रतिम प्रतिभा आणि बुद्धिमत्ता दाखवून देशात आणि जगात नावलौकिक मिळविणाऱ्या सीए रिजवाना शेख हिच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# मोदींचा इशारा

आधुनिक केसरी

पश्चिम बंगालमधील परगणा जिल्ह्यातील संदेशखाली येथे महिलांवरील अत्याचाराचे प्रकरण काही दिवसांपूर्वी समोर आले होते. त्यानंतर पीडित महिलांनी एका तृणमूल काँग्रेस नेत्याच्या विरोधात आवाज उठवला होता. त्यानंतर हे प्रकरण देशभर गाजले. स्थानिक भाजपा पदाधिकाऱ्यांनी त्या तृणमूल काँग्रेसच्या नेत्यावर कारवाई करण्यासाठी अनेक मोर्चे काढले होते. या मोर्चांनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील याप्रकरणाची दखल घेतली होती. भाजपाच्या स्थानिक पातळीवरील नेत्या रेखा पात्रा यांनी संदेशखाली येथील महिलांवरील अत्याचाराविरोधात आवाज उठवला होता आणि भाजपाच्या आंदोलनाचे नेतृत्व केले होते. त्याच रेखा पात्रा यांना भाजपाने लोकसभेची उमेदवारी दिली आहे. दरम्यान, मोदी यांनी पुन्हा एकदा संदेशखाली प्रकरणावर भाष्य केले आहे. पश्चिम बंगालच्या कूचबिहार येथे ४ एप्रिल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा पार पडली. यावेळी मोदी म्हणाले, सर्वप्रथम ममता दिदींचे (पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री) आभार मानतो. २०१९ च्या निवडणुकीवेळी याच मैदानातून मी पश्चिम बंगालच्या जनतेला संबोधित करण्यासाठी आलो होतो. त्यावेळी ममता दिदींनी हे मैदान आकाराने लहान करण्यासाठी मैदानाच्या मधोमध एक स्टेज बांधले होते. त्यावेळी मी म्हणालो होतो की जनता याचे उत्तर देईल. यावेळी ममता दिदींनी कोणताही अडथळा निर्माण केला नाही. त्यामुळे मला सर्वांना भेटता आले. गेल्या १० वर्षांत जो विकास झाला तो केवळ एक ट्रेलर होता. आता आपण आणखी पुढे जाणार आहोत. मोदी यांनी यावेळी संदेशखाली प्रकरणावर भाष्य केले. ते म्हणाले, संपूर्ण बंगाल आणि देशाने पाहिले आहे की, संदेशखाली प्रकरणातील आरोपींना वाचवण्यासाठी तृणमूलने त्यांची ताकद पणाला लावली होती. संदेशखालीतल्या महिलांबरोबर जे काही झाले तो तृणमूलच्या अत्याचारांचा कळस होता. भाजपाने ठरवले आहे की, संदेशखालीच्या गुन्हेगारांना शिक्षा दिल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. त्यांना त्यांचे संपूर्ण आयुष्य तुरुंगात काढावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मी म्हणतोय की देशातून भ्रष्टाचार हद्दपार करा आणि विरोधी पक्ष म्हणतायत भ्रष्टाचाऱ्यांना वाचवा. ते म्हणतात मोदींचे काही कुटुंबच नाही. परंतु, संपूर्ण भारत हेच माझे कुटुंब आहे. आम्ही सीएए कायदा आणला. परंतु, विरोधी पक्ष त्या कायद्याबाबत अपप्रचार करत आहेत, लोकांमध्ये असत्य पसरवत आहेत.

# प्रतिगाम्यांना शिव्या देणे म्हणजे पुरोगामी नव्हे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारत आज वेगवेगळ्या समस्येतून जात आहे. एकीकडे देशातील लोकशाही व सोबतच लोकांचे हक्क अधिकार, शिक्षण, नोकरी, आरोग्य धोक्यात असुन देशातील प्रत्येक नागरिक कोणत्या ना कोणत्या समस्येंने ग्रस्त असुन मुळ समस्येची जाणीव होऊ नये म्हणून देव व धर्माचा आधार घेतला जात आहे. देशात वेगवेगळ्या विचार सरणीचे लोक आहेत. सत्ताधारी लोक व त्यांनी देव धर्म याच्या माध्यमातून निर्माण केलेले भक्त हे व्यवस्थेचा भाग आहेत तर या व्यवस्थेला विरोध करणारे आणि देव धर्म यापलीकडे माणुस व माणुसकी महत्वाची असून देश व देशातील जनतेचा सर्वांगीण विकास व्हायला पाहिजे म्हणून व्यवस्थेला विरोध करणारे राजकीय व सामाजिक लोक.**

राजकीय लोक पुरोगामी व थोडेफार विचारवंत त्यांच्या सोईनुसार होतात, म्हणायला च ते पुरोगामी असतात परंतु आचरण हे प्रतिगामी लोकांचेच असते. म्हणजे एकीकडे संत व त्यांचे विचार सांगायचे आणि दुसरीकडे वैयक्तिक फायद्यासाठी त्यांच्या विचारा विरोधात वागायचे. असे पण काही पुरोगामी आहेत. पुरोगामी होणे म्हणजे सरळ सरळ व्यवस्थेला दोष देऊन शिव्या देणे एवढेच मर्यादित झाले आहे. व्यवस्थेसोबत हातमिळवणी करणाऱ्यांना भक्त म्हणून आपण व्यवस्थे विरोधात थोडफार बोलून पुरोगामी, वैचारिक किंवा महान कधीच होणार नाही. जात धर्म मंदिर हे आजच्या व्यवस्थेचे विषय आहेत. बऱ्याच लोकांना फक्त हे राजकीय विषय वाटतात परंतु राजकीय सत्ता हि विषमतावादी व्यवस्थेच्या कचाट्यात आहे हे ही मान्य करावे लागेल. व्यवस्थेचे भक्त मंदिराला समर्थन करत आहेत तर बाकीचे लोक मंदिराला नाही पण मंदिर उद्‌घाटन यावर चर्चा करून प्रत्येक जन राजकीय झोळी भरण्याची संधी बघत आहेत. परंतु आता सत्ता लोकांच्या मतातुन नाही तर इव्हिएमच्या माध्यमातून स्थापण होते हे ही विसरून चालणार नाही. सत्ताधारी व विरोधी दोघेही आपल्याला परिने मंदिराचे राजकारण करत आहेत. हि गोष्ट बारीक विचार केला तरच कळेल. राजकीय लोक आपल्याला फायद्यासाठी मंदिराचा वापर करून घेत आहेत मग स्वतःला आंबेडकरवादी समजणाऱ्या समुहाची यामध्ये काय भुमिका आहे? त्यांचा मंदिराला, मंदिराच्या उद्‌घाटनाला वा सरकार च्या ध्येयधोरणाला विरोध आहे? हे अजुनही स्पष्ट झाले नाही. कारण स्वतः ला आंबेडकरवादी समजणारे पुरोगामी लोक स्वतः च एक थोर विचारवंत, अभ्यासक आहेत म्हणुन प्रत्येकांचे मत वेगवेगळे येते. परंतु महत्त्वाचा मुद्दा हा आहे मंदिर बांधकाम सुरू झाले, पैसा खर्च होत आहे, मंदिरावर पुजाऱ्याचे, ट्रस्टीचे पोट तर राजकारण्यांचे वोट आहे. मग आज चर्चा फक्त मंदिरावरच केली तर काही निष्पन्न होणार आहे का? चर्चा अशा विषयावर व्हायला पाहिजे ज्यातून काही निष्पन्न होईल. परंतु मुळ मुद्दा हाच आहे की आम्ही महत्वाच्या मुद्यावर कधीच चर्चा करत नाही. बर एखादी घटना घडण्याआधी ही चर्चा होत नाही, घटना घडून गेली की दोन दिवस गरम गरम वक्तव्य करायचे तिसऱ्या दिवशी शांत बसायचे. यालाच काही लोक वैचारिक समजतात. म्हणून चुकीचे लोक सत्तेत जाऊन चुकिची व्यवस्था मजबूत करत आहेत. पण याकडे अभ्यासक, तज्ञ व वैचारिक लोकांचे लक्षच आहे की नाही हा प्रश्न आहे. कारण कोकीळेने जर गाणे बंद केले तर कावळ्यांचा कावकाव ही मधुर वाटतो. आणि आज तेच घडत आहे. आपण सत्य सांगण्यात कमी पडलो म्हणून असत्य पसरत आहे, विज्ञान सांगण्यात कमी पडलो म्हणून अज्ञान पसरत आहे, वास्तव सिद्ध करण्यात कमी पडलो म्हणून पाखंड थोतांड वाढले, संताचे वार समजला नाही म्हणून भोंदुबुवाचा उत आला. एखाद्या राजकीय नेत्याने राजकीय स्वार्थासाठी संविधानाचे किंवा बाबासाहेब आंबेडकर यांचे दाखले दिले तर त्यांना डोक्यावर घेतले जाते, परंतु रात्रंदिवस कोणत्याही प्रकारची अपेक्षा न करता जे लोक संविधान, बाबासाहेब व विज्ञान सांगतात त्यांना दूर्लक्षीत केले जाते.भक्तांना जागृत करणारे लोक स्वतः बद्दल च जागृत नाहीत याबद्दल खंत वाटते, जागृत म्हणजे फक्त भक्तांचे दोष दाखवने नव्हे तर स्वतः ची व्यवस्था निर्माण करणे होय. अंधविश्वास, थोतांड, बुवाबाजी ला विरोध करून भक्तांना झोपलेले समजणारे लोक लेण्या, कोरेगाव भिमा चा जयस्तंभ, समाजातील बेकीकरण याबाबत मात्र बोलणे सोईस्कर टाळतात. प्रतिगामी लोकांचे थोतांड, अंधविश्वास पाखंड बुवाबाजी जरी असली तरीही ते समाजात पेरणी करतात पुरोगामी लोकांकडे विज्ञान सत्य आणि संत असले तरी पेरणी होत नाही म्हणून जे पेरले तेच उगवणार हा सिद्धांत सोडून पुरोगामी कसे होता येईल.त्याचे खोटे जरी असले तरी खोट्याला खरं ठरवण्यासाठी त्यांच्या कडे शाळा कॉलेज मिडीया आहे स्वतः ला वैचारिक, पुरोगामी, अभ्यासक समजणारे, लाखों करोडोचे घरे बांधुन लाखोंच्या गाड्यात फिरणाऱ्यांनी स्वतः च्या शाळा कॉलेज मिडीया का उभा केला नाही. ज्यांनी शाळा कॉलेज व मिडीया उभा करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले त्यांना सहकार्य का केले नाही. स्वतः ला वैचारिक व पुरोगामी समजणाऱ्यांनी ही चुकीच्या लोकांना साथ देऊन प्रामाणिक लोकांचे वाटोळे केले. प्रतिगामी लोकांनी भक्त जरी निर्माण केले तरीही भक्ताच्या जोरावर त्यांची व्यवस्था टिकुनच नाही तर मजबूत करत आहेत, स्वतःला वैचारीक, अभ्यासक तज्ञ व राष्ट्रीय अध्यक्ष समजणाऱ्या लोकांनी वैचारिक फळी निर्माण करून चळवळीला किती हात भार लावला?

आज देवा धर्माच्या नावाखाली अंधविश्वास, भोंदुगीरी पाखंड जरी पसरवले जात असले तरीही लोक स्वतः खर्च करून तेथे जातात कारण तेथे भावना आहेत. परंतु वैचारिक आंबेडकरवादी लोकांच्या भावना कुठे आहेत संविधानात? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारात? प्राचीन शिल्प व लेण्यात? कोरेगाव भिमाच्या जय स्तंभात? वरील पैकी कुठे आहेत भावना? आज संविधान धोक्यात आले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेऊन त्यांचे विचार पायदळी तुडवले, बुद्धांच्या लेण्या, स्तुप यांचे दैविकरण सुरू असताना फक्त बघ्यांची भुमिका घेतली जात आहे, कोरेगाव भिमाचा जयस्तंभ चा खटला उच्च न्यायालयात सुरू आहे तरीही कोणाला काही घेणे देणे नाही. स्तंभ हा अतिक्रमाणाच्या विखळ्यात अडकलेला आहे, तो कधीही पडू शकतो, एवढी गंभीर गोष्ट ही वैचारिक, तज्ञ, अभ्यासक व राष्ट्रीय नेत्यांना कळू नये म्हणजे हे स्वतः कीती जागृत असतील. जयस्तंभ अतिक्रमणात, लेण्या व बौद्ध मुर्तीचे दैविकरण हि खुप गंभीर समस्या निर्माण झाली आहे. या साठी आर्थिक व एकीची खुप गरज आहे. आज जर लेण्यांचे दैविकरण आणि जयस्तंभाचे संवर्धन करायचे म्हणून आर्थिक आव्हान केले तर किती लोक आर्थिक सहकार्य करतील? भावना असल्यावर सहकार्य आपोआपच होते. म्हणून देवाधर्माचा विषय आला तर करोडो रुपये गोळा होतात पण आमच्या लेण्या स्तंभ संविधान यावर काम करताना घरदार संसार याकडे दुर्लक्ष करून भिक माघावे लागते तरीही कोणी भिकही घातल नाही हे पुरोगामीत्व आहे. बुद्धमूर्ती चे दैविकरण करून पुजले जात आहे या आशयाच्या रिल्स बनवल्या जातात, परंतु दैविकरणातून बुद्धाची मुर्ती बाहेर कशी काढायची यासाठी कीती लोक समोर येतात. आपल्या डोळ्यासमोर बुद्धभुषण प्रिंटिंग प्रेस जेथे डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वतः वर्तमानपत्र काढत होते ती नष्ट करून टाकली, दोन दिवस धिंगाणा झाला आता तर लोक विसरून ही गेले. याला आंबेडकरवादी म्हणायचे का? नाचगाणे मनोरंजन यासाठी शे पाचशे रुपये देऊन निरर्थक खर्च करणे यालाच काही महाभाग सामाजिक कार्य समजतात. प्रतिगामी लोक कामधंदा नोकरी करताना एकुण कमाई मधला काही भाग हा त्यांच्या सामाजिक कामासाठी काढून ठेवतात, नोकरी कामामधुन निवृत्त झाले तर पुर्णवेळ आंबेडकरवादी लोकांच्या भाषेत अंधविश्वास व पाखंड समाजात पसरवण्याचे काम करतात. आणि पुरोगामी लोक नोकरी करताना घर, गाडी, मुलांचे शिक्षण लग्न यामध्ये खर्च करतात काही लोकांची मुले चांगली सेटल झालेली असतात पण हे निवृत्त होतात. निवृत्त झाल्यावर घरात बसून लोकांना तत्वज्ञान सांगतात, बाहेर पडायचे वय झाले म्हणतात, आर्थिक मदत करायची तर मीच पेंशनर आहे म्हणतात, स्वतः चे पेंशन, मुलांचा पगार, असून ही समाजासाठी देण्याची मानसिकता नसलेले लोक ही स्वतःला मात्र पुरोगामी समजून स्वतःला आंबेडकरवादी समजतात.

स्वतः कडे वेळ पैसा असूनही तो खर्च न करता केवळ मी वैचारिक आहे, मी निवृत्त आहे, मी सरकारी सेवेत आहे हे दाखवण्यासाठी अनेक लोक वैचारिक बनण्याचे सोंग करतात. सत्ताधारी व चुकीच्या लोकांना विरोध करण्याआधी आपण बरोबर वागायला पाहिजे. इतरांना फक्त शिव्या देऊन आपण आपले श्रेष्ठत्व वा मोठेपणा, वैचारिक पातळी विकसित करू शकत नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले शिका संघटीत व्हा संघर्ष करा, आपल्या उत्पनातील विसावा भाग अर्थात पाच टक्के समाजाच्या कल्याणासाठी द्यावा. एवढे सर्व स्पष्ट लिहले असून, सर्वांना वाचता येत असुन एकत्र येऊन संघर्ष करत नसतील, आपल्या उत्पन्नातील पाच टक्के वाटा समाजाच्या कल्याणासाठी देत नसतील, वेळ देत नसतील तर अशा लोकांना विषमतावादी किंवा संविधान विरोधी व्यवस्था निर्माण करणाऱ्यांना फक्त शिव्या देऊन काय साध्य करायचे आहे. त्यांची व्यवस्था संविधान, हक्क अधिकार यांच्या विरोधात असली तरीही तेथे पैसा, वेळ, बुद्धी देणारे लोक खुप आहेत, स्वतः ची संपती, स्वतः ची जमवलेली सर्व रोख रक्कम ते लोक व्यवस्थेला दान देतात आणि विचार पेरतात. म्हणून त्यांच्या विचाराचे पिक उगवते. आपण पेरणी करत नाही, पेरणी करणाऱ्यांना मदत करत नाही आणि उगवलेल्या रोपांना दोष देऊन आपण महान होणार नाही. म्हणून आपल्याला पैसा वेळ बुद्धी देऊन संविधान, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, लेण्या, जयस्तंभ, यांचे संवर्धन करायचे आहे. त्यांच्या मंदिरावर आणि चुकिच्या वर्तनावर बोलण्या आधी आपली व्यवस्था, वैचारिक परिपक्वता, आणि संघटन आवश्यक आहे. फक्त शिव्या देऊन दोष देऊन होणार नाही तर प्रति व्यवस्था उभी करण्यासाठी प्रबोधन करणे आवश्यक आहे.

# आपण आपल्या आवडीनुरुप समोरच्या व्यक्तीचे गुणदोष ठरवत असतो



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जो पर्यंत आवड आहे तोपर्यंत दोष दिसत नाही आणि आवड संपली की गुण दिसत नाही आपण आपल्या आवडी निवडी नुसार समोरच्या व्यक्तीचे गुणदोष निर्धारित करत असतो.काल्पनिक असो कि वास्तविक अगोदर गुण प्रभावीत करत असतात मग स्नेह आणि जवळीकता निर्माण होते. व लवकरच बाधा पण निर्माण होते.हा नैसर्गिक नियम आहे.शाश्वत संबंधात गुण दोष पाहिले जात नाहीत म्हणून ते शाश्वत संबंधात कधीच बाधा येत नाही.आपला स्वार्थ जो पर्यंत शिल्लक आहे तोपर्यंत आपण दोष पाहत नाही.स्वार्थ संपला कि गुण पाहत नाही.हे कटु सत्य आहे पण उघडपणे कोणीही मान्य करणार नाही कारण आपण निर्मोही नाहीत. निर्मोही व्यक्ति ला सर्व सारखेच असतात तो कोणा मध्ये सुद्धा गुणदोष पाहत नाही कोणाला चांगलं वाईट ठरवतं नाही.**

त्याच्या लेखी सगळे सारखेच असतात.व्यक्ति म्हटलं कि गुण दोष आलेच.कहि तुरळक व्यक्तिंचा अपवाद सोडला तर दोष नाहित असा कोणीही व्यक्ति सापडण जरा कठिण असतं.पण आपण आपल्या हितानुसार सोयीनुसार गुणदोष ठरवत असतो. हे आपलं अजब गजब तत्वज्ञान आहे.नैसर्गिक गुणदोषाशी आपल्याला फार काही देणं घेणं नसतं. जो पर्यंत आपला स्नेह भाव आहे अथवा तो वृद्धिंगत होण्याच्या मार्गावर दिशेने आहे.तोपर्यंत आपण चुकुन सुद्धा संबंधित व्यक्ती मध्ये अवगुण पाहत नाही. अथवा आपल्याला त्या व्यक्ती मध्ये चूकुन सुद्धा एकही वाईट गुण दिसत नाही. पण ज्या क्षणी स्नेह संपतो त्या क्षणी सगळे चांगले गुण संपुष्टात येतात आणि सर्व वाईट गुण प्रकट होऊन दिसायला चालु होतात.एकही चांगला गुण दिसत नाही.मग हे असं कास व्यक्ती तोच आहे फक्त वेळ आणि परिस्थिती बदलली कि स्थिती बदलते या साठी मानवी स्वभाव स्थायीभाव कारणीभूत आहे.जो पर्यंत आपल्याला कोणी व्यक्ति आवडतो अथवा आपण त्याच्याशी जोडले जातो. तेव्हा आपण त्या मध्ये दुर्गुण पाहत नाही.पण आपली आवड संपली कि सद्‌गुण पाहत नाही हा मानवी जीवनाचा स्थायीभाव आहे. याला अपवादात्मक माणसं सोडली तर बहुतांश सगळ्यांच्या बाबतीत हेच घडतंय व्यक्ती आपल्या मनांतुन उतरताच सर्व गुण अवगुणात रूपांतरीत होतात. आपली आवड निवड समोरच्या व्यक्तिचे गुणदोष ठरवते मुळात जो पर्यंत व्यक्ति आपल्याला आवडतो तोपर्यंत त्या व्यक्ति मध्ये आपल्याला कोणाताही दोष दिसत नाही अथवा आपण कोणत्याही अवगुणावर चिंतन करत नाही.पण ज्या दिवशी ज्या वेळी व्यक्ती आपल्या मनातुन उतरतो त्या वेळी मात्र सर्व गुण अवगुणात रूपांतरीत होऊन आपण एवढी मोठी दुर्गुणांची यादी तयार करतो कि पाढा वाचयला लागतो तर ज्याच्या विषयी हा पाढा आहे तोच अवाक होतो हे वास्तव आहे.नैसर्गिक गुणदोष हा मानवी स्वभावाचा अविभाज्य भाग आहे.पण हेच गुण दोष आपण आपल्या हितानुसार बौद्धिक चातुर्य नुसार स्वार्थ मोह वेळ प्रसंग निकड यानुसार ठरवतो वास्तविक हि सत्याशी प्रतारणा आहे पण मानवी जीव म्हटलं कि सत्यनिष्ठ कमी आणि प्रतारणा जास्त असाच काहीसा प्रकार असुन हा प्रकार कुठं तरी थांबायला हवा.कधीतरी सत्याला सत्य म्हटलं पाहिजे जे योग्य आहे ते योग्य म्हटलं पाहिजे जे अयोग्य आहे ते अयोग्य म्हटलं पाहिजे मग समोर कोणीही असो.व्यक्ति पाहुण मत ठरवलं तर मग सत्य बाहेर येवु शकत नाही.आणि असत्याचा प्रवास फार काळ चालत नाही.हित लाभ स्वार्थ मोह या पलिकडे जाऊन आपण निरीक्षण केलं तर नक्कीच वास्तविक गुण दर्शन झाल्याशिवाय राहणार नाही.पण आपण वास्तविक गुण दर्शन घेण्यासाठी उत्सुक नसतो.नैसर्गिक गुण हे नैसर्गिक गुण असतात पण माणसाला सत्य लवकर पचत नाही आपण असत्य ऐकुन समाधानी होतो.पण त्याच ठिकाणी सत्य दर्शन घडलं तर मग गडबडतो.आपल्याला सत्याशी जवळीक नको असते.मुळात गुण दोष हे वस्तुनिष्ठ असले पाहिजेत वस्तुनिष्ठ गुण दोष असतील व स्नेह अथवा जवळीक हि निस्वार्थ असले तर मग आकर्षण कधीच कमी होणार नाही आणि वाढणार पण नाही जवळीकता हि कायम एकसारखी रहिल.आणि कायम एकसारखी रहाणारी जवळीक शाश्वत असते.हिच शाश्वत जवळीक गुणदोष ठरवत नाही पाहत नाही.मुळात आपण वास्तव आणि सत्या पासून अनभिज्ञ असतो.लाभ हित स्वार्थ पाहून नाही तर वास्तविक गुण दोष समजले पाहिजेत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# महिलांबाबतच्या विखाराला आवर घाला

## भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांचा काँग्रेसनेत्यांना इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काँग्रेस पक्ष हा राक्षसी शक्तींचे आगर बनला असून काँग्रेस नेत्यांकडून महिलांना वारंवार गलिच्छ भाषेत अपमानित केले जात आहे. महिलांबाबतच्या या विखाराला काँग्रेसने वेळीच आवर घालावा अन्यथा जनताच तुम्हाला तुमची जागा दाखवत पराभवाची धूळ चाटवेल अशी टीका भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली.
प्रसिद्धीपत्रकात श्रीमती वाघ यांनी लिहीले की, भारतीय संस्कृतीमध्ये यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः अशा शब्दांत स्त्री शक्तीचा गौरव केला आहे. मात्र त्याच नारीशक्तीचा काँग्रेसकडून वारंवार अपमान होत आहे. काँग्रेसचे खासदार रणदीप सुर्जेवाला यांनी,स्वतःला सभ्य म्हणवणाऱ्या समाजातल्या कुणाही व्यक्तीची मान शरमेनं खाली जावी, इतक्या गलिच्छ भाषेत महिलांना उद्देशून घाणेरडी टिप्पणी केली. त्यांनी आपल्या भाषणात खासदार आणि अभिनेत्री हेमा मालिनीजी यांच्याबाबत सडकी मुक्ताफळं उधळली होती. पहिल्यांदा अभिनय आणि नंतर राजकीय क्षेत्रात



स्वतःला सिद्ध करणाऱ्या हेमा मालिनी यांचाच नव्हे तर स्वकर्तृत्वाने प्रगतीच्या वाटेवरून पुढे निघालेल्या सर्वसामान्य भारतीय स्त्रियांचा हा अपमान आहे असेही त्यांनी पत्रकात म्हटले.
श्रीमती वाघ यांनी म्हटले आहे की खासदार सुर्जेवाला यांची मुक्ताफळे बघा. सुरजेवाला लिहीतात की "आपण आमदार/खासदार कशासाठी बनवतो? जेणेकरून,ते आपला आवाज उठवतील. ही मंडळी कुणी हेमा मालिनी तर नसतात, जिला केवळ चाटण्यासाठी बनवलं जातं."खासदार महिलेबाबत लिहायची ही कुठली भाषा.एका सहकारी खासदार महिलेचे इतक्या घाणेरड्या शब्दांत वर्णन करायची ही काँग्रेसवाल्यांची कुठली संस्कृती, असा परखड सवाल ही त्यांनी प्रसिद्धीपत्रकातून विचारला. काही दिवसांपूर्वी काँग्रेसच्या महिला नेत्याने भाजपा उमेदवार व अभिनेत्री कंगना राणौत यांच्यावरही अशाच असभ्य  शब्दात टिपण्णी केली होती.तसेच काँग्रेसचे सर्वोच्च नेते राहुल गांधी यांनी तर नारीशक्ती संपवण्याची भाषा केली होती. यातून काँग्रेस नेते महिला शक्तीकडे कोणत्या दृष्टीतून पाहतात हेच दिसले,असेही वाघ यांनी पत्रकात नमूद केले आहे.

# नवीन पदस्थपना दिलेल्या प्राथमिक शिक्षकांनी मर्जीच्या गावासाठी लावली वशिलेबाजी

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** आचार संहिता लागण्याअगोदर बुलढाणा जिल्हा परिषदेचे उर्दू व मराठी प्राथमिक शिक्षक भरती करण्यात आली. पण या शिक्षक भरती मध्ये निवड झालेल्या शिक्षकांनी वशिलेबाजी लावुन अधिकारी यांच्याकडून आपल्याला हवे असलेली गावे बदलून घेत भ्रष्टाचार केल्याची लेखी तक्रारच डोणगांव येथील जमील पठाण व अन्य जणांनी दि. 2 एप्रिलला मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांना केली असून सदर शिक्षकांना रिक्त जागा असणाऱ्या संग्रामपुर जळगाव जामोद परीसरातील शाळांवर पदस्थपना देण्याची मागणी केली आहे. त्यांनी आपल्या तक्रारीत नुकतेच आचारसंहिता लागण्याअगोदर बुलडाणा जिल्हयामध्ये उर्दू व मराठी प्राथमिक शिक्षकांची पदभरती करण्यात आली व जिल्हयातील प्राथमिक शिक्षकांच्या जागा भरण्यात आल्या परंतु सदर जागा भरल्या व पदस्थापना दिली.
परंतु नियुक्त झालेल्या शिक्षकांने आपआपले राजकिय वशिले लावुन पदस्थापना दिलेली शाळा बदलुन शिक्षकांच्या मर्जीप्रमाणे पुन्हा पदस्थापना देण्यात आली. याची आपल्या स्तरावर चौकशी करुन कार्यवाही करणे गरजेचे आहे. कारण संग्रामपुर, जळगाव जामोद या परिसरात अनेक शिक्षकांचे पदे रिक्त आहेत त्या ठिकाणी प्रथम पदस्थापना देणे आवश्यक असताना शिक्षण विभागाने ज्या परिसरात आवश्यकता नाही. त्या परिसरात शिक्षकांच्या सोयीच्या दृष्टीने पदस्थापना देऊन गैरप्रकार केल्याचे दिसत आहे. याची आपण नियुक्त झालेल्या शिक्षकांची प्रथम यादी पाहुन आपल्या लक्षात येईल तरी आपण प्रथम व द्वितीय यादी पाहुन पुर्वीच्या ठिकाणी (संग्रामपुर, जळगाव जामोद) या परिसरात पुर्वीच्या ठिकाणी प्रथम यादीप्रमाणे शिक्षकांना नियुक्ती दयावी व सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन कार्यवाही करावी व याबाबत मला सुध्दा लेखी कळवावे असे नमुद केले आहे.

# ग्रामीण भागातही आयपीएल सट्टेबाजीचे लोन

## तरुणांना पडत आहेत लखपती होण्याची दिवास्वप्ने

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील व ग्रामीण भागात अगदी बिनधास्त मोठ्या प्रमाणात धुमाकूळ माजविला असतानाच यामध्ये आता आयपीएल क्रिकेट सट्ट्याचीही भर पडली आहे.
नुकतेच २२ मार्चपासून सुरू झालेल्या आयपीएलच्या क्रिकेट सामन्यावर युवा वर्गाकडून लाखो रुपयांचा सट्टा लावला जात आहे. विशेष म्हणजे पूर्वी शहरापुरताच मर्यादित असणारा हा आयपीएल क्रिकेटचा सट्टा आत्ता सोयगाव सह परिसरातील ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात पोहोचला आहे.
क्रिकेटवर सट्टा लावण्याचे लोन आता ग्रामीण भागातही पोहोचल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. मोबाइल, लॅपटॉप व इंटरनेट या तंत्रज्ञानाचा उपयोग करून कोणता संघ टॉस जिंकेल,कोणता खेळाडू किती रन काढेल, कोणता खेळाडू किती विकेट घेईल, कोणता संघ हा सामना जिंकेल अशा क्षणाक्षणाला घडणाऱ्या घटनांवर पैसे लावून सट्टा लावला जात आहे. त्यासाठी सोयगाव तालुक्यातील अनेक लहान मोठ्या गावात आदी ठिकाणी आयपीएलच्या क्रिकेट सामन्यावर सट्टा लावणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. एरव्ही गावातील चावडीवर वयोवृद्ध किंवा प्रमुख व्यक्ती गावातील विकासाच्या बाबतीत चर्चा करण्यासाठी वापर करायचे. मात्र आता त्यांच्या जागी हातात स्मार्टफोन घेऊन क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणाऱ्या आयपीएल क्रिकेटची मॅच पाहणारे तरुण युवावर्ग यांचे जथेच्या जथे एकत्र येत असल्या चित्र पाहावयास मिळत आहे.

**आपण आत्ताच व्याजाने पैसे घेवून लावताहेत सट्टा** : शॉर्टकटच्या मार्गाने जास्त पैसा कमावण्याच्या नादात युवा वर्ग आयपीएल क्रिकेट सट्ट्याच्या आहारी जात आहेत. त्यासाठी आपल्या जवळचे असलेले पैसे हरल्यानंतरही आज ना उद्या आपले भवितव्य उजळेल या आशेने उसनवारी करून किंवा शेकडा दहा ते पंधरा टक्के व्याजाने पैसे घेऊन सट्टा लावण्यापर्यंत मजल मारीत आहेत. अनेक क्रिकेटच्या शैकिनाला दिवसा सप्न पडत असुन आज ना उद्या आपण ही करोडपती होणार असल्याचे बाता करीत हात उसनवारी किवा व्याजदर नुसार हजारो रुपये घेत असल्याने दिवसभर एकच विचार मनात राहत असल्याचे दिसत आहे. सध्या ५०-६० टक्के लोक जास्त करून तरुण वर्ग ऑनलाईन कुपन्स, रिवार्ड, या भूल थापाना बळी पडत आहे. आणि फ्री सामना पाहण्यासाठी नको त्या वेबसाईट ला जाऊन, लिंक ला जाऊन क्लिक करत आहे, आणि सट्टा आणि बेटिंग लावत आहे, अश्या अनेक प्रकारच्या न्युज वृत्तपत्रात येत आहे, हे पण एक वेसन आहे, यामुळे तुम्ही गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात अडकवू शकता, सावध राहा, सतर्क रहा. **सुरेश बागुल, सायबर अभ्यासक**



# मतदान जनजागृती स्पर्धेत साक्षी बुधवंत प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** स्वीप मतदान टक्केवारी वाढीसाठी योजने अंतर्गत घेण्यात आलेल्या मतदान जनजागृती रांगोळी स्पर्धेत कु. साक्षी विजय बुधवंत हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्या अनुषंगाने कु. साक्षीला प्रशस्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

रिसोड नगर परिषद व उत्तमचंद बगडीया कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वीप मतदान टक्केवारी वाढीसाठी विवीध स्पर्धांचे आयोजन सुद्धा करण्यात आले होते. सदर उपक्रमातील रांगोळी स्पर्धेत येथील विद्यार्थिनी कु. साक्षी विजय बुधवंत हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्या निमित्ताने वाशिमच्या उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी प्रशस्ती पत्र देऊन साक्षीला सन्मानित केले आहे. यावेळी रिसोडच्या तहसिलदार प्रतीक्षा तेजनकर, नगर परिषदचे प्रशासक तथा मुख्याधिकार सतिष शेवदा आणि उत्तमचंद बगडीया महाविद्यालयाचे प्राचार्य विनोद कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती. कु. साक्षीने रेखाटलेल्या अप्रतिम रांगोळीचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# ईव्हीएम–व्हीव्हीपॅटचे रँडमायझेशन पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा मतदार संघांतर्गत ईव्हीएम व व्हीव्हीपॅटचे द्वितीय रँडमायझेशन (सरमिसळ ) जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले. यावेळी सामान्य निवडणूक निरीक्षक लोकेशकुमार जाटव, निवडणूक निर्णय अधिकारी विनय गौडा जी.सी. तसेच राजकीय पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर रँडमायझेशन करतेवेळी 13- चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा अधिकारी विनय गौडा यांनी उपस्थित राजकीय पक्षांना, द्वितीय रँडमायझेशन नुसार विधानसभा मतदारसंघातील कोणत्या मतदान केंद्रावर कोणत्या क्रमांकाचे कंट्रोल युनीट, बॅलेट युनीट आणि व्हीव्हीपॅट जाईल, याबाबत माहिती दिली.
त्यानंतर सदर रँडमायझेशन राजकीय पक्षांच्या समक्ष करण्यात आले आणि जिल्ह्यासाठी प्राप्त झालेल्या ईव्हीएम, व्हीव्हीपॅट विधानसभा मतदारसंघनिहाय प्रत्येक मतदान केंद्रासाठी निश्चित झाल्या. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात मतदान केंद्रांची संख्या 2118 असून यासाठी 2610 बॅलेट युनिट, 2610 कंट्रोल युनीट आणि 2818 व्हीव्हीपॅट उपलब्ध झाल्या आहेत. यापैकी द्वितीय रँडमायझेशन नुसार राजूरा विधानसभा मतदारसंघातील 330 मतदान केंद्रासाठी (बीयू – 412, सीयू – 412 आणि व्हीव्हीपॅट - 445), चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातील 383 मतदान केंद्रासाठी (बीयू – 478, सीयू – 478 आणि व्हीव्हीपॅट - 517), बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील 361 मतदान केंद्रासाठी (बीयू – 451, सीयू – 451 आणि व्हीव्हीपॅट - 487), वरोरा विधानसभा मतदारसंघातील 340 मतदान केंद्रासाठी (बीयू – 425, सीयू – 425 आणि व्हीव्हीपॅट - 455), वणी विधानसभा मतदारसंघातील 338 मतदान केंद्रासाठी (बीयू – 405, सीयू – 405 आणि व्हीव्हीपॅट - 439) आणि आर्णि विधानसभा मतदारसंघातील 366 मतदान केंद्रासाठी (बीयू – 439, सीयू – 439 आणि व्हीव्हीपॅट - 475) ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट निश्चित झाल्या आहेत. यावेळी ईव्हीएम, व्हीव्हीपॅट व्यवस्थापन कक्षाचे नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, संगणकीकरण आणि माहिती तंत्रज्ञान व्यवस्थापन कक्षाचे नोडल अधिकारी तथा जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी सतिश खडसे उपस्थित होते.



# डोणगाव येथे रेतीचा अवैध साठा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**डोणगाव :** मेहकर तालुक्यातील डोणगाव येथे सध्या अवैध रेती वाहतूक व विक्री सुरू असल्याने तहसीलदार निलेश मडके यांनी अवैध रेती विक्री करणारावर कारवाई सुरू केली आहे. असाच एक रेतीचा साठा मालेगाव ते मेहकर रोडवर असणाऱ्या एका मद्रासच्या मागे असल्याची गुप्त माहिती तहसीलदार निलेश मडके यांना 3 एप्रिल ला मिळताच त्यांनी सदर बाब तलाठी अनुप नरोटे पल्लवी गुंठेवार अमोल राठोड संदीप परमाळे यांना कळविताच सदर पथक तेथे पोहोचले व त्यांनी सदर ठिकाणी 6 ब्रास अवैध रेती आढळून आली सदर रेती उबेद जाकीर खासाब यांची असल्याचे कळाले यावरून तलाठी यांनी पंचनामा करून अहवाल तहसीलदार यांना पाठविला आहे.



# विकसित भारतासाठी भाजपाला साथ द्या

## वर्धा येथील सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचा संकल्प सोडला आहे. या विकासाच्या संकल्पाला साथ देण्यासाठी रामदास तडस यांना प्रचंड बहुमताने विजयी करा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्धा येथे बुधवारी केले. वर्धा लोकसभा मतदारसंघातून भाजपा शिवसेना, राष्ट्रवादी महायुतीचे उमेदवार, खा.रामदास तडस यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी झालेल्या विजय संकल्प सभेत फडणवीस बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खा.डॉ.अनिल बोंडे, ज्येष्ठ नेते रामदास आंबटकर, प्रदेश सहमुख्य प्रवक्ते आशीष देशमुख तसेच शिवसेना, राष्ट्रवादी, रिपब्लिकन पक्षाचे नेते, पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. फडणवीस यावेळी म्हणाले की, वर्धा जिल्हा काँग्रेसमुक्त झाला, मात्र या भागातून पंजाही गायब होण्याचे श्रेय शरद पवारांना आहे. या मतदारसंघासाठी काँग्रेसला लोकसभेसाठी उमेदवारही सापडला नाही, परिणामी राष्ट्रवादीचा उमेदवार आयात करण्याची वेळ काँग्रेसवर आली. कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष असलेल्या खा. तडस यांचा उल्लेख करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, तडस हे पुन्हा विरोधकांना धोबीपछाड देणार आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरदचंद्र पवार गट) शरद पवार यांचे कुस्तीतील पॅनल ताब्यात घेणारे तडस यांना यंदा 60 टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महात्मा गांधीजी यांची भूमी असलेल्या वर्धा मतदारसंघाचे नेतृत्त्व करणारे रामदास तडस हे संयमी खासदार म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या दोन कालावधी दरम्यान लोकसभेत 1035 प्रश्न उपस्थित केले. तर 113 चर्चांमध्ये सहभाग घेतला. अशा कार्यक्षम उमेदवारालाच वर्ध्याचे मतदार पुन्हा निवडून देतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. खा. तडस यांचे ही यावेळी भाषण झाले.





# अंधश्रद्धा दुःखाला कारणीभूत : स्वामी अरुण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** श्रद्धा ही शुद्ध पवित्र सात्विक असावी, अंध श्रद्धा नसावी अंध श्रद्धा दुःखाला करणी भूत आहे, असे अडबंगनाथ संस्थानचे मठाधिपती स्वामी अरुणनाथगिरीजी महाराज यांनी श्री. क्षेत्र वेरूळ येथील नाथ आश्रमात आयोजित संगीतमय नवनाथ कथेत उपदेश केला. यावेळी कथेसाठी वेरूळ, कसाबखेडा, गल्लेबोरगाव, मंबापुर, पळसवाडी, आखातवाडा, चिंचोली, सराई, भडजी, यासह तालुक्यातील हजारो नाथ भक्तांची उपस्थिती होत असून संगीतमय नवनाथ कथेसाठी आलेले भाविक भक्तिरसात न्हाऊन निघत आहे. अबाल वृद्धापासून ते तरुणांपर्यंत सगळेच पंचक्रोशीतील भाविक कथेसाठी येत आहे. कथेनंतर महाप्रसादाचा लाभ भाविक घेत आहेत. सदरील कथा सोमवार दि.१ एप्रिल सोमवार पासून दि.८ एप्रिल 2024 पर्यंत सुरू झाली असून सायंकाळी 7 ते 9 कथेला प्रारंभ झाला आहे.

गाथा नवनाथांची कार्यक्रमातील कलाकार उपस्थित राहणार आहे.या नवनाथ कथेसाठी दिनांक 6 एप्रिल रोजी सोनी टीव्ही मराठी वाहिनी वरील गाथा नवनाथांची या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण होणार असल्याचे आश्रमाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# पोलिसांकडून ९ सोमालियन चाच्यांना अटक

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** मासेमारी नौकेवरील खलाश्यांना ओलीस ठेवणाऱ्या ९ सोमालियन चाच्यांना मुंबई पोलिसांनी अटक केली. भारतीय नौदलाने विशेष मोहिम राबवून त्यांच्या ताब्यातून २३ खलाश्यांची सुटका केली होती. भारतीय नौदलाकडून समुद्रातून चालणारे व्यापारी जहाज व त्यावरील नाविकांना यांची सुरक्षेसाठी गस्त घातल असताना २८ मार्चला आय. एन. एस. त्रिशुल व नौदलाचे जहाज सुभेदा यांना इराणमधील मासमेमारी नौकेचा चाच्यांनी ताबा घेतला असून सर्व खलाश्यांचे अपहरण करण्यात आल्याची माहिती मिळाली. त्यानुसार २९ मार्चला पहाटे तीनच्या सुमारास आय. एन. एस. त्रिशुल व नेव्हल शिप सुभेदा सोमालियाच्या हद्दीतील १०५ सागरी मैल अंतरावर गेले. यावेळी नौका थांबवून ओलिस ठेवलेल्या खलाश्यांची सुटका करण्याचा इशारा भारतीय नौदलाकडून देण्यात आला. पण चाच्यांनी नौदलाचे ऐकले नाही. आय एन एस सुमेधा या युद्ध नौकेने जाऊन मोबाईल ब्रॉडकास्ट यंत्रणेद्वारे चाच्यांशी संपर्क साधून त्यांना इशारा दिला. त्यामुळे घाबरलेल्या चाच्यांनी खलाश्यांना समोर करून आपण शरण येत असल्याचे कळवले. त्यानंतर चाच्यांनी त्यांच्याकडील शस्त्रे पाण्यात फेकली. त्यानंतर नौदलाचे जवान संबंधित नौकेवर उतरले. तपासणी नौकेवर नऊ चाचे सापडले. नौदलाने नौकेवरील २३ खलाश्यांची सुटका केली. ते सर्व पाकिस्तानी नागरिक होते. त्यांच्याकडे चौकशी केली असता चाच्यांकडे एके ४७ रायफल हॅन्डग्रेनेड व रॉकेट लॉन्चर होते आणि ते जबरदस्तीने त्यांच्या मासेमारी नौकेवर चढले. त्यांनी शस्त्राचा धाक दाखवून त्यांना बंदी बनवले. नौकेच्या पाहणीत एके ४७ रायफलचचे ७२८ जिवंत काडतुसे तसेच एक जीपीएस डिव्हाईस, आठ मोबाईल संच इत्यादी साहित्य जप्त केले. सोमालियन चाच्यांनी ताब्यात घेतलेली इरानियन देशाची मासेमारी नौका व त्यावरील २३ खलाश्यांकडे चौकशी करून त्यांना सोडून दिले आणि एकूण ९ सोमालियन चाच्यांना यलोगेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पोलिसांनी त्यांना याप्रकरणी अटक केली आहे. त्याच्याविरोधात अपहरणासह पारपत्र अधिनियम, परकीय नागरी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**अटक आरोपींची नावे :** जेली जामा फराह (५०), अहमद बशीर उमर (४२), अब्दीकरिन मोहम्मद शायर (३४) अदान हसन वारमासे (४४), मोहम्मद अब्दी अहमद (३४), अब्दीकादिर मोहम्मद अली (२८), अयदिद मोहम्मद जिमले (३०), यासीन अदान (२५) व जामा सैद एल्मी (१८)

# स्वीप अंतर्गत युवा मतदारांकरिता रिल्स, पोस्टर्स व मिम्स स्पर्धा

## विजेत्यांना मिळणार रोख बक्षिसे

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा निवडणूक 2024 करीता 13 - चंद्रपूर लोकसभा मतदार संघात 19 एप्रिल 2024 रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीत सर्व स्तरातील, वयोगटातील मतदारांनी अधिकाधिक संख्येने सहभागी व्हावे व नवमतदार म्हणजेच युवा वर्गाचा यात सहभाग वाढावा, यादृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे 'माय व्होट इज माय फ्युचर : पावर ऑफ वन व्होट' या थीमवर रिल्स, पोस्टर्स मेकींग व मिम्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



लोकशाहीमध्ये मतदानाला अत्यंत महत्व आहे. देशाच्या प्रगतीसाठी, ध्येयधोरणे ठरविण्यासाठी तसेच दिशा देण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकांनी मतदान करायलाच हवे. याचाच एक भाग म्हणून स्वीप अंतर्गत वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येतात. 13 - चंद्रपूर लोकसभा मतदार संघात 19 एप्रिल 2024 रोजी मतदान होणार असून सकाळी 7 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत मतदान करता येईल. 18 वर्षांवरील प्रथम मतदार मोठ्या संख्येने असल्याने व युवकांमध्ये रिल्स, पोस्टर व मिम्सचे विशेष आकर्षण असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांकरीता विशेष रोख पारितोषिके देण्यात येणार आहे. रिल्स स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकाला प्रथम बक्षीस 15 हजार रुपये, द्वितीय बक्षीस 10 हजार तर तृतीय बक्षीस 5 हजार रुपये दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे पोस्टर्स स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस 5 हजार, द्वितीय 3 हजार तर तृतीय बक्षीस 2 हजार रुपये आहे. तसेच मिम्स स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम 5 हजार, द्वितीय 3 हजार तर तृतीय बक्षीस 2 हजार रुपये देण्यात येणार आहे.

मतदान करण्याबाबत जनजागृती करून मतदानाची टक्केवारी वाढविणे, यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून नागरीकांनी स्वतः बनविलेले रिल्स, पोस्टर्स व मिम्स् HTTPS://FORMS.GLE/UCRYEJKAHIQV५Q८T७ या लिंकवर 12 एप्रिल 2024 पर्यंत अपलोड करून पाठवावे. सदर लिंक जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषदेच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध आहे. या स्पर्धेत मोठ्या संख्येने भाग घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अ‍ॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# काँग्रेसची गॅरंटी ही चायना मालासारखी : उपाध्ये

आधुनिक केसरी न्यूज




**मुंबई :** अनेक वर्षे देशाची सत्ता भोगणाऱ्या काँग्रेसने गरीबी हटाव सारखी अनेक आश्वासने दिली. मात्र यातले एकही आश्वासन पूर्ण केले नाही. अशा काँग्रेसने 5 गोष्टींची दिलेली गॅरंटी ही चायना मेड वस्तूंसारखी आहे, अशी टीका प्रदेश भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी गुरुवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते ओमप्रकाश चौहान आदी यावेळी उपस्थित होते.

उपाध्ये म्हणाले की, नक्कल करायलाही अक्कल लागते आणि ती अक्कल काँग्रेसकडे नाही, हे मोदी सरकारची नक्कल करून काँग्रेसचे नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी देशाला दाखवून दिले. केवळ एका घराण्याच्या विकासाची गॅरंटी देणाऱ्या काँग्रेसच्या नव्या गॅरंटीमुळे आता देशातील जनता पुन्हा फसणार नाही, उलट देशाच्या विकासाचा ध्यास घेतलेल्या मोदी सरकारच्या पारड्यात प्रचंड बहुमताने सत्तेचे दान टाकेल. गेल्या दहा वर्षांत प्रत्येक निवडणुकीत मतदारांनी झिडकारल्यानंतरही पुन्हा एकदा जनतेच्या फसवणुकीसाठी मोहब्बत की दुकान सारखे फसवे मुखवटे घालून काँग्रेसी नेते जनतेकडे मतांची याचना करीत आहेत. पंतप्रधान मोदी यांनी देशाला विकासाची गॅरंटी दिली. ती पूर्ण करून दाखवली. गरीब, युवक, महिला, शेतकरी या चारच जाती देशात असून त्यांच्या विकासाकरिता भाजप कटिबद्ध असल्याची गॅरंटी पंतप्रधान मोदी यांनी देशाला दिली आहे. गरीबी हटाव नारा देणाऱ्या काँग्रेसच्या काही मोजक्या नेत्यांची आणि पक्षाला वेठीस धरणाऱ्या गांधी घराण्याची गरीबी हटली, देश मात्र अधिकाधिक गरीब होत गेला. शेतकरी कर्जबाजारी झाला. शेतकऱ्याच्या कर्जमुक्तीच्या नावाखाली बँकांच्या तिजोऱ्या भरून शेतकऱ्याच्या पदरात मात्र कर्जाचे ओझे कायमच ठेवण्याचा पराक्रम काँग्रेसी सत्ताधीशांनी केला, असेही ते म्हणाले.

उपाध्ये म्हणाले की, पंतप्रधान मोदी केवळ गॅरंटीच्या घोषणा करत नाहीत, तर गेल्या दहा वर्षांत त्यांनी दिलेली प्रत्येक गॅरंटी पूर्ण केल्याचे देशाने अनुभवले आहे. देशातील 25 कोटी लोकसंख्येच्या कपाळावरील दारिद्र्यरेषा मोदी सरकारच्या प्रयत्नांमुळे कायमची पुसली गेली असून जगाने याची दखल घेतली आहे. मोदी सरकारने जाहीर केलेला प्रत्येक संकल्प पूर्ण झाल्याचे चित्र देशाने पाहिले आहे. कलम 370 रद्द करणे, राम मंदिर उभारणी, औद्योगिक विकास, रोजगाराच्या संधी, महिलांचे सक्षमीकरण, अशा प्रत्येक क्षेत्रातील मोदी की गॅरंटी खरी ठरते हे लक्षात आल्यावर आता त्यांच्या गॅरंटीची नक्कल करत न्याय आणि विकासाच्या कागदी घोषणा करून काँग्रेस पुन्हा देशातील जनतेला मूर्ख बनविण्याचा प्रयत्न करत आहे. काँग्रेसच्या प्रत्येक घोषणेतील पोकळपणा जनतेस माहीत आहे, याची जाणीव असूनही मोदी यांची नक्कल करताना काँग्रेसने आपली अक्कल एवढी गहाण टाकली, की मोदी मंदिरात गेले की यांचे नेते मंदिरांच्या पायऱ्या झिजवतात, मोदींनी गंगास्नान केले की यांचे नेते डुबकी मारतात, मोदी यांनी प्रचारयात्रा काढल्या की यांचे नेते देशात पदभ्रमणासाठी बाहेर पडतात. अशा नक्कल करण्याच्या हतबलपणामुळेच आता काँग्रेसने पाच न्याय आणि पंचवीस गॅरंटी दिल्या आहेत. अशा पाच पंचवीस फसवणुकांतून जनता यापूर्वीही गेलेली असल्याने, आता नक्कल देखील कामाला येणार नाही, अशी खिल्ली उपाध्ये यांनी उडवली.



# जगण्याच्या भोगण्यातून आयुष्य सुंदर करता येते : 'बिराड'कार पवार

आधुनिक केसरी न्यूज

**ब्रह्मपुरी :** प्रत्येकाच्या आयुष्यात चढ,उतार येते. मी पालात राहून जीवनशिक्षण घेतले. महाविद्यालयात गेलो नाही. शाळेत थोडेफार शिकलो. आपल्या या जीवनाचे अनुभव पुस्तकात मांडले आहे. एक चूक झाली तरी चालेल पण काहीही करुन पोरांना पुढे नेले पाहिजे. मुलांनीही आयुष्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे.आज तुम्हाला सर्व सुविधा आहेत,त्याचा फायदा घ्या.खूप संघर्ष व मेहनत करा कारण जगण्याच्या भोगण्यातून आयुष्य सुंदर करता येतं" असे बहूमोल मार्गदर्शन प्रसिद्ध लेखक 'बिराड'कार अशोक पवारांनी केले.

ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील पदव्युत्तर मराठी विभाग व संशोधन केंद्र आयोजित परिसंवाद व निरोप समारंभात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.डी.एच गहाणे तर प्रमुख उपस्थितीत उपप्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, डॉ.रेखा मेश्राम, डॉ.राजेंद्र डांगे, डॉ.वर्षा चंदनशिवे, विभागप्रमुख डॉ.धनराज खानोरकर उपस्थित होते. यावेळी पाहूण्यांनीही मार्गदर्शन केले.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ गहाणेंनी, पवारांच्या आत्मकथनपर भाषणातून आपण प्रेरणा घ्यायला हवी असे सांगून एवढया मोठया लेखकाला चरितार्थासाठी बॅंकेत नोकरी करावी लागते. साहित्याने पोट भरत नाही, हे मराठी भाषेचे दुर्दैव आहे, अशी खंत व्यक्त केली.

प्रास्ताविक व परिचय विभागप्रमुख डॉ. धनराज खानोरकरांनी केले तर संचालन कमलेश वैलथरे, भारती तुपट व आभार प्रा. माधव चुटेंनी मानले. कार्यक्रमाला डॉ.मोहन कापगते, डॉ.युवराज मेश्राम, डॉ.मिलिंद पठाडे, प्रा.रुपेश वाकोडीकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विभागातील डॉ.प्रकाश वट्टी, डॉ.पद्माकर वानखडे, प्रा.प्रशांत राऊत, प्रा. गणेश सांगोळकर, स्वाती धनविजय व इतर विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# सहा एप्रिलपासून अवकाळीचे संकट

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यात तापमानाचा आलेख वाढत चालला आहे. विदर्भात सूर्य अक्षरशः आग ओकत आहे. तापमानाचा पारा आता ४२ अंश सेल्सिअसच्याही पलीकडे गेला आहे. तर या उन्हाळ्यात तो सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, आता पुन्हा एकदा भारतीय हवामान खात्याने राज्यात सहा एप्रिलपासून अवकाळीचे संकट घोंगावत असल्याची वर्दी दिली आहे. पाच एप्रिलपासूनच राज्यात पावसासाठी पोषक वातावरण तयार होत आहे. यामुळे उकाड्यापासून दिलासा मिळण्याऐवजी त्यात वाढ होण्याचीच दाट शक्यता आहे. भारतात यावर्षी एप्रिल ते जून या कालावधीत उन्हाचा कडाका सरासरीपेक्षा अधिक राहील, असा इशारा भारतीय हवामान खात्यानेच दिला होता. महाराष्ट्रात त्याची प्रचिती येत असून तापमानात वेगाने वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद विदर्भात होत असून बुधवारी ते ४२ अंश सेल्सिअसच्याही पलीकडे पोहोचले. त्यातच आता खात्याने नवा अंदाज जाहीर केला आहे. तो उन्हाचा नसून अवकाळी पावसाचा आहे. येत्या सहा ते नऊ एप्रिलदरम्यान राज्यात गारपिटीसह अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. शुक्रवारपासूनच राज्यात पावसासाठी पोषक वातावरण तयार होताना दिसणार आहे.



# मोलखेडा, हिवरी ते देवळगाव गुजरी रस्त्यावर वाहनचालक त्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा हिवरी ते देवळगाव गुजरी रस्त्याची अंत्यत दयनीय अवस्था झाल्याने काम हाती घेण्यात आलेले आहे. गेल्या चार महिन्यांपासून काम सुरू असून अद्यापही अर्धवटच आहे. अनेक ठिकाणी मुरूम टाकलेला असल्याने मोठे वाहन गेले की, रस्त्यावर धुळीचे लोळ उडत आहे. याचा सर्वाधिक त्रास विद्यार्थी व दुचाकीस्वारांना सहन करावा लागत असून संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष आहे.हिवरीहते देवळगाव गुजरी ३ कि. मी. अंतर असून खांदेशला जोड़णारा हा मुख्य रस्ता आहे. यामुळे रात्रंदिवस या रस्त्यावर वाहनांची वर्दळ असते. रस्त्याचे काम सुरू असल्याने काही रस्ता दुतर्फा खोदण्यात आलेला आहे. तर काही भागाचे खोदकाम सुरू होते मात्र ठेकेदाराने काम बंद करून ठेवले आहे. मोठे वाहन समोरून गेले किंवा समोर जात असले तर मागील वाहन धुळीच्या लोळात दिसत नसल्याचे चित्र आहे. पिंपळवाडी, महालब्धा, मोलखेडा व हिवरी रस्त्यावर असे धुळीचे लोळ उडत आहे. पिंपळवाडी, महाल्बदा ,हिवरी व मोलखेडा, घाणेगाव तांडा आदी गावांतील तरुण बुलढाणा किंवा देवळगाव गुजरी कामाला असल्याने दररोज येजा करतात. धुळीमुळे दररोज ये-जा करणारे तरुण त्रस्त असून रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अधून-मधून अपघात होत धूळ उडू नये म्हणून रस्त्यावर पाणी मारण्याची जबाबदारी ही कंत्राटदाराची आहे. पाणी मारले तर धूळही उड़णार नाही व रस्याचे कामही मजबूत होईल. मात्र या रस्त्यावर पाणी मारले जात नसल्याने हा रस्ता किती काळ टिकेल हे सांगणे कठीण आहे.

सध्या लग्न सराई सुरू असून लग्नाला जाणाऱ्या – येणाऱ्यांची मोठी वर्दळ दिसून येत आहे . मात्र रस्त्यावरील उडणाऱ्या धुळीमुळे नटून थटून जाणाऱ्यांचे कपडे माखत असल्याने मोठी पंचाईत होत आहे . हिवरी ते देवळगाव गुजरी रस्त्याचे काम गेल्या चार ते पाच महिन्यांपासून सुरू आहे . हे कासव गतीने असून रस्त्याने ये–जा करणाऱ्या वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे . दुचाकीस्वार त्रस्त झाल आहेत .आणि चक्क ठेकेदाराने अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम करुन काम बंद करून ठेवले आहे .यामुळे वाहनधारक, शेतकरी, विद्यार्थी यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे .

**उपसरपंच गुलाबसिंग राणा हिवरी,मोलखेडा ता सोयगाव**

# सावळदबारा येथे महा –ई सेवा केंद्राचालकांना तहसीलदार मनीषा मेने यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे दि ३/४/२४ महा -ई सेवा केंद्र चालक सुनील माकोडे यांच्याबददल दैनिक आधुनिक केसरी मध्ये बातमी येताच सोयगाव तहसीलदार मनीषा मेने यांनी तात्काळ दखल घेऊन महा -ई सेवा केंद्राची के वाय सी चे जास्त घेत असल्याची तक्रार शेतकरी दिलीप देशमुख यांनी लेख निवेदनाद्वारे केली होती बातमी दखल घेऊन तहसीलदार मनीषा मेने येथील महा -ई सेवा केंद्राची चौकशी करून पूर्ण माहिती घेतली आहे. सावळदबारा येथे के वाय सी पासून वंचित असलेले शेतकरी १२५ १५० आहे. सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात किती शेतकरी असतील वंचित असलेल्या शेतकऱ्यांकडून १५० रुपये घेतले जात असल्याची तक्रार दिलीप देशमुख यांनी केली होती. यासाठी सोयगाव तहसील कार्यालयाच्या यादीतहलाभार्थ्यांची नावे प्रकाशित केली जातात, ज्यावेळी यादीत नाव येईल, त्या-त्या वेळी लाभार्थ्यांना मिळणा-या शासकीय अनुदानाकरिता तलाठी स्तरावर मिळणारे विशिष्ट क्रमांक टाकूनच स्वतःचे बँक खाते केवायसी करावे लागते, अन्यथा शासनाच्या सानुग्रह अनुदानाचा लाभ मिळत नाही.सबंधीत शेतकरी दिलीप देशमुख सामाजिक कार्यकर्ते यांनी के वाय सी च्या नावाखाली १०० ते १२५ शेतकऱ्यांची लूट सोयगाव तालुक्यात लूट थांबवा अशी तक्रार देऊन दैनिक आधुनिक केसरी चे उपसंपादक गोकुळसिंग राजपूत यांनी बातमी प्रकाशित केली होती.सोयगाव तहसीलदार मनीषा मेने यांनी चौकशी करून संबंधित शेतकरी दिलीप देशमुख यांनी दिलेली तक्रार मागे घेतली.



सोयगाव तालुक्यात काही परिसरात महा ई – सेवा केंद्र चालकांकडून के वाय सी, विविध प्रमाणपत्रे काढण्यासाठी विद्यार्थ्यांकडून जास्तीचे पैसे आकारले जात असल्याचा प्रकार "दैनिक माझा मराठवाडा"च्या वतीने बुधवारी करण्यात आलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये उघडकीस आला होता . या संदर्भातील वृत्त गुरुवारी प्रसिद्ध झाल्यानंतर महा ई – सेवा केंद्र चालकांमध्ये खळबळ उडाली . याबाबत तहसीलदार मनीषा मेने म्हणाले की, शासनाने महा ई – सेवा केंद्र चालकांना प्रमाणपत्रे देण्यासंदर्भात दर ठरवून दिले आहेत . अधिकचे पैसे घेणाऱ्या महा ई – सेवा केंद्रांची चौकशी करण्यात येईल . यामध्ये दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई केली जाईल . आणि आता सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरातील महा– ई सेवा केंद्रामध्ये नुकसान झाले त्यांना अनुदान मिळणार आहे त्यांची के वाय सी मोफत होईल तशे आदेश केंद्र चालकांना देण्यात आले आहे .कोणत्याही शेतकऱ्यांनी पैसे न देता के वाय सी करुन घ्यावे .त्या शेतकऱ्याची जनतेनेही शासकीय दरापेक्षा अधिकचे पैसे देऊ नयेत, काही तक्रार असल्यास सोयगाव तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा .

**तहसीलदार मनीषा मेने सोयगाव**

माननीय दंडाधिकारी तथा तहसीलदार साहेबसोयगाव यांनी सावळदबारा महा– ई – सेवा केंद्र संचालकाला भेट देऊन त्यांना कुठल्याही शेतकऱ्याला केवायसी करण्यापासून अडवणूक करू नका अशा पद्धतीचे आदेश काढून शेतकरी प्रवर्गाला मोठा दिलासा दिला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो आणि माझी तक्रार मागे घेतो आणी महा ई सेवा केंद्र संचालक यांनी माननीय दंडाधिकारी यांच्या आदेशाची काटेकोरपणे पालन करावे ही त्यांना विनंती करतो .

**दिलीप देशमुख, सामाजिक कार्यकर्ते, सावळदबारा, ता . सोयगाव**

# पंतप्रधान घरकुल आवास योजनेचा झाला बट्ट्याबोळ

## जिंतूर नगर परिषदेत बाराशेच्यावर घरकुल लाभार्थी यांना पाचव्या हप्त्याची प्रतीक्षा ?

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** पंतप्रधान घरकुल आवास योजना सन 2018 पासून केंद्र सरकारने राबविण्यास सुरुवात केली ही योजना शहरी भागात महानगर पालिका, नगर पालिका, नगर पंचायत मार्फत राबविण्यात येत आहे तर ग्रामीण भागात ही योजना पंचायत समिती मार्फत राबविण्यात येत आहे सन 2018 पासून जिंतूर नगर पालिका ही योजना राबवित आहे गोरगरीब सामान्य जनता ने या योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व कागदपत्रांची पूर्तता करून फाईल दाखल करण्यात आले यावरून घरकुलांना नगरपरिषद, नगर रचना, महाडा यांनी मंजुरी दिले जिंतूर नगर परिषदेने सन 2018 पासून सन 2022 पर्यंत चार वर्षांत 2336 पंतप्रधान घरकुल मंजूर केले मात्र घरकुल लाभार्थी यांना वेळे वर हफ्ते देण्यात आले नाही त्यामुळे ही योजना रखडली आहे चार डी पी आर मध्ये 2336 घरकुल मंजूर केले यात कोणाला एक हफ्ता तर कोणाला दोन कोणाला तिसरा चौथा असे चारच हफ्ते टाकण्यात आले 2336 लाभार्थीया पैकी 1234 लाभार्थी यांनी आपलीं पदरमोड करून उसने पुसने करून घरकुलचे बांधकाम पुर्ण केले



आता यांना पाचव्या हप्त्याची प्रतिक्षा करावी लागत आहे पाचवा हफ्ता मिळाला तर ज्याच्या कडुन उसने पैसे घेतले होते त्यांना परत करूंन कर्ज मुक्त होऊ पाहत आहे मात्र जिंतूर नगर पालिका ही पांचवा हफ्ता का टाकतं नाही ? असा प्रश्न घरकुल लाभार्थी विचारत आहे परभणी जिल्ह्यातील इतर नगर पालिका पाथरी, सेलू, गंगाखेड, पुर्णा, सोनपेठ, तसेच पालम नगर पंचायत आदी नगर पालिकांनी पाचवा हफ्ता वितरित केला आहे मग जिंतूर नगर पालिका पंतप्रधान घरकुल आवास योजनेच्या लाभार्थ्यांना का टाकत नाही? जिंतूर नगर परिषदेच कशात घोड अडल? पंतप्रधान घरकुल आवास योजनेचे लाभार्थी गोरगरीब सामान्य जनता नगर परिषदेत चकरा मारीत आहे लाभार्थी या मध्ये अशी कुजबूज सुरू आहे कीपाचवा हफ्ता नगर पालिका मिळण्याच्या तयारीत आहे? मा जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तसेच लोकप्रतिनिधी ने या कडे लक्ष देणे गरजेचे आहे घरकुल योजनेत काम करणारे येथील कर्मचारी धरकुल लाभार्थ्यांकडून चेरी मेरी घेऊनच लाभार्थ्या कडून सर्वे व ऑनलाइन फोटो च्या नावाखाली वसूल करत आहे यावर नव्याने रुजू झालेले मुख्य अधिकारी लक्ष देतील काय असा सवाल नागरिकांकडून होत आहे.



# सकल मराठा समाजाचा उमेदवार उभा करण्यास संभाजी ब्रिगेडचा विरोध : शेरे

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** परभणी येथे काही स्वयंघोषित मराठा नेत्यांनी बैठक घेऊन लोकसभा निवडणुकीत मराठा समाजाच्या नावाने उमेदवार देण्याचे घोषित करण्यात आले होते या बैठकी दरम्यान संभाजी ब्रिगेडचा पाठिंबा असल्याचे सांगण्यात आले मात्र सकल मराठा समाजाचा उमेदवार उभा करण्यास संभाजी ब्रिगेडचा विरोध असल्याचे संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष छगन शेरे यांनी दिनांक 3 एप्रिल रोजी संभाजी ब्रिगेड कार्यालयात आयोजीत करण्यात आलेल्या बैठकीत सांगीतले. आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने संभाजी ब्रिगेडच्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या भेटीसाठी दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते यानिमित्त शहरातील संभाजी ब्रिगेड कार्यालयात आयोजीत बैठकीला संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष छगन शेरे,विभागीय अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब काजळे,शिवाजी मोकाशे हे उपस्थित होते यावेळी पुढे बोलताना शेरे म्हणाले की,मराठा आरक्षणाच्या अभूतपूर्व मोर्चांनंतर सकल मराठा समाजाच्या वतीने उमेदवार उभा करावा ही मागणी निवडणुकांचे बिगुल वाजल्यानंतर सातत्याने पुढे आली.त्यासाठी बैठकांचे सत्रही पार पडले.मात्र अंतर्गत बंडाळी व मराठा मतदारांची मतविभागणी लक्षात घेता मराठाद्रोही भाजपच्या महायुतीच्या उमेदवाराला याचा फायदा होऊ शकतो हे लक्षात घेऊन आदरणीय मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाच्या वतीने अपक्ष उमेदवार उभा करणार नसल्याचे जाहीर केले आहे. मात्र अजूनही काही लोक जाणीवपूर्वक सकल मराठा समाजाच्या वतीने परभणी लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उमेदवार उभा करण्यात यावा ही भूमिका घेत आहेत.

त्यांची ही भूमिका संदिग्ध व अनाकलनीय आहे त्यांच्या या भूमिकेमुळे आदरणीय मनोज जरांगे पाटील यांचे नेतृत्व मान्य नसल्याचे उघड होत आहे परिणामी मराठा मतदान विभागले जाऊन भाजपप्रणीत महायुतीचा उमेदवार निवडून येण्यास सकल मराठा समाजाची ही आत्मघातकी भूमिका पोषक ठरेल असे लोकसभा निवडणुकीत सकल मराठा समाजाचा उमेदवार उभा केल्यास मतविभागणी होईल व ती मतविभागणी टाळण्यासाठी व मराठा आरक्षणाचा खेळखंडोबा करणाऱ्या भाजपप्रणीत महायुतीच्या उमेदवाराला पराभूत करण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या पाठीशी उभे राहावे ही जाहीर भूमिका आम्ही संभाजी ब्रिगेडच्या वतीने घेत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले बैठक यशस्वी करण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# यवतमाळमध्ये धावती रुग्णवाहिका पेटली; गर्भवतीसह चार जण सुदैवाने बचावले

आधुनिक केसरी न्यूज



**यवतमाळ :** रुग्णाला दवाखान्यात घेवून जाणारी धावती रुग्णवाहिका पेटली. चालकाने प्रसंगावधान राखून वाहन थांबविण्याल्याने सुदैवाने जीवितहानी टळली, मात्र रुग्णवाहिका जळून नष्ट झाली. ही घटना आज गुरूवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास येथील आर्णी मार्गावरील अमृत लॉन समोर घडली. दिग्रस येथून चालक नीलेश राऊत हे रुग्णवाहिका (क्र. एमएच १४-सीएल ०९०५) मध्ये गर्भवती रुग्णाला घेवून यवतमाळ येथे घेवून येत होते. रुग्णासोबत तिचे नातेवाईक व डॉक्टर आणि नर्स असे पाचजण रुग्णवाहिकेत होते. रुग्णवाहिका यवतमाळ शहरात पोचल्यानंतर अमृत लॉन समोर वाहनाच्या बॉनेटमधून अचानक धूर येत असल्याचे चालकाला दिसले. चालकाने अचानक ब्रेक दाबून वाहन थांबविले, तोपर्यंत वाहनाच्या केबिनमध्ये आग लागली. चालकाने गाडी खाली उडी मारली. रस्त्यावरील नागरिकांनी रुग्णवाहिकेतील लोकांना बाहेर काढले. तोपर्यंत संपूर्ण रुग्णवाहिका आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. नागरिकांनी पाण्याचा मारा करून आग विझविण्याचा प्रयत्न केला. अग्निशमन दलास आगीची माहिती दिली. अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहचले. त्यांनी आग आटोक्यात आणली. रुग्णास दुसऱ्या रुग्णवाहिकेने शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. मात्र घटनेमुळे या मार्गावरील वाहतूक काही काळ खोळंबली होती. दोन आठवड्यापूर्वी धावती कार पेटल्याची घटना कळंब येथे घडली होती. वाढत्या उन्हामुळे वाहन पेटण्याच्या या घटना घडत आहेत.




# रश्मी बर्वे यांच्या जातवैधता प्रमाणपत्र रद्द करण्याच्या निर्णयाला न्यायालयाची स्थगिती

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष आणि काँग्रेस नेत्या रश्मी बर्वे यांचे जातवैधता प्रमाणपत्र जिल्हा जातप्रमाणपत्र पडताळणी समितीने रद्द ठरविले होते. यामुळे त्यांचा रामटेक लोकसभा निवडणुकीतील अर्ज रद्द करण्यात आला. याविरुद्ध बर्वे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाद मागितली होती.

गुरुवारी सकाळी उच्च न्यायालयाने रश्मी बर्वे यांना दिलासा देत जातवैधता समितीच्या निर्णयाला अंतरिम स्थगिती दिली आहे. मात्र निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असल्याने त्यात हस्तक्षेप करण्यास न्यायालयाने नकार दिला. न्या. अविनाश घरोटे आणि न्या. मुकुलिका जवळकर यांच्या खंडपीठाने गुरुवारी या प्रकरणी अंतरिम आदेश दिला. न्यायालयाने





सर्व प्रतिवादी यांना नोटीस बजावून २४ एप्रिल पर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेशही दिले. याचिकेनुसार, रश्मी बर्वे यांच्या जातप्रमाणपत्राचा एक मुद्दा अलीकडेच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने निकाली काढला. मात्र, गेल्या आठवड्यात राज्य सरकारने नव्याने त्यांच्या चौकशीचे आदेश जारी केले. तसेच गेल्या आठवड्यात जिल्हा जातपडताळणी समितीनेसुद्धा बर्वे यांना नोटीस बजावली. समितीने तर त्यांना अवघ्या २४ तासांत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले. हे नैसर्गिक न्याय नियमांच्या विरुद्ध आहे. इतकेच नाही तर अगदी तातडीने समितीने त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र रद्द ठरविले. ही सर्व प्रक्रिया राजकीय सुडापोटी होत असून ती अवैध असल्याचा दावा करणारी याचिका रश्मी बर्वे यांनी त्यांचे वकील समीर सोनावणे यांच्यामार्फत उच्च न्यायालयात दाखल केली होती. त्यावर तातडीने सुनावणी व्हावी, यासाठी याचिकाकर्त्यांतर्फे मागील आठवड्यात प्रयत्न करण्यात आले. प्रकरण आजच ऐकले जावे, अशी निकड नसल्याचे मत नोंदवित न्यायालयाने सुनावणी घेण्यास नकार दिला होता.

# पोषक वातावरणामुळे उन्हाळी मूग जोमात

## मात्र आवक वाढल्यास भाव कोमात जाण्याची भीती कायम

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** यंदा खरिप आणि रब्बी हंगामातील पिकांना नैसर्गिक संकटामुळे चांगलाच फटका बसला आहे. परिणामी शेतकऱ्यांना उत्पन्नात कमालीची घट सोसावी लागली आहे. त्यामुळे आर्थिक डबघाईस आलेल्या शेतकऱ्यांना आता फक्त उन्हाळी पिकांचा थोडाफार दिलासा मिळणार आहे. सद्यस्थितीत पोषक वातावरणामुळे उन्हाळी मूगाचे पीक जोमात असल्यामूळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. मात्र उत्पादन वाढून बाजारात आवक वाढल्यास भाव कोमात जाण्याची भिती शेतकऱ्यांच्या मनात कायम आहे. यावर्षी अल्पवृष्टिमुळे खरिप हंगामातील सोयाबीन पिकाची वाट लागली होती. तर हवामानातील अनियमिततेमुळे रब्बी हंगामातील पिकांनी सुद्धा शेतकऱ्यांची घोर निराशा केली आहे. परिणामी सिंचनाची सुविधा उपलब्ध असलेल्या भागात उन्हाळी मुगाचा पेरा मोठ्या प्रमाणात झाला आहे. सद्यस्थितीत वातावरण पोषक असल्यामूळे मुगाचे पीक चांगलेच जोमात आहे. तुरळक प्रमाणात होणारा अवकाळी पाऊस आणि ढगाळ वातावरण याचा पाहिजे तेवढा दुष्परिणाम होत नसल्याने शेतकरी निश्चिंत आहेत. मात्र निसर्गाचा लहरीपणा पुन्हा अवखळला आणि गारपीट झाली तर उन्हाळी पिके सुद्धा भुईसपाट होणार याची भिती शेतकऱ्यांना आजही सतावत आहे. सर्वात कमी दिवसात म्हणजे केवळ ६० ते ६५ दिवसात थेट बाजारपेठेत पोहचणारे उन्हाळी मूग हे एकमेव पीक आहे. तद्वतच ऐन खरिपाच्या तोंडावर आर्थिक अडचण असातांना सदर पिकाचा आधार मिळतो. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी नगदी पीक उन्हाळी मूग ओळखल्या जातो. त्यासाठी या पिकला शेतकरी आधाराचा हात म्हणुन ओळखतात. शिवाय मानवी आहाराच्या दृष्टीने मुगास विशेष महत्त्व आहे. मुगामधील २० ते २५ टक्के असलेली प्रथिने ही तृणधान्यातील प्रथिनांना पुरक असल्याने रोजच्या आहारात मुगाचा सर्रास वापर केला जातो. परिणामी मुगाला सर्वच स्तरातून मोठ्या प्रमाणात मागणी असते. त्यामुळे भाव सुद्धा चांगला मिळतो. परंतु यंदा मुगाचा पेरा कमालीचा वाढला असून, अखेर पर्यंत वातावरण पोषक राहिल्यास उत्पादन सुद्धा बऱ्यापैकी वाढणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र ज्या शेतमालाचे उत्पादन वाढून बाजारपेठेत आवक वाढते त्या शेतमालाचे बाजार भाव हमखास गडगडतात हा शेतकऱ्यांचा नित्याचा अनुभव होऊन बसला आहे. म्हणुन सद्यस्थितीत मुगाचे पीक जोमात असले तरी आवक वाढल्यास भाव कोमात जाण्याची भिती शेतकऱ्यांच्या मनात कायम आहे. या गंभीर बाबीकडे संबंधीत यंत्रणेने विशेष लक्ष द्यावे अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

**हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांच्या कष्टांची किंमत होणे गरजेचे :** यंदा सुरुवातीपासूनच आस्मानी सोबतच सुल्तानी संकटांनी शेतकऱ्यांचा पाठलाग सुरुच ठेवला आहे. आस्मानी संकटांमुळे सोयाबीन पिकाचा उतारा कमी लागला. तर बाजारपेठेत सुल्तानी संकटांमुळे कवडी मोल भावात शेतमाल विकावा लागला आहे. मात्र याची "ना शासनकर्त्यांना जाण ना लोकप्रतिनिधींना भान "घाम गाळून, कष्ट करून बळी जातो तो केवळ" बळीराजाचा "म्हणून किमान उत्पादन खर्चावर आधारित शेतमालाला भाव देऊन, निदान त्याच्या कष्टाची किंमत होणे गरजेचे आहे. कारण बारा महिन्यातील २४ तास राबणारा शेतकरी हा या भूतलावरील एकमेव "राजा" आहे. कदाचित म्हणूनच त्याला बळीराजा ही उपाधी मिळली असावी असे अपरोधाने बोलले जात आहे.



उन्हाळी हंगामात असून सुद्धा कमी पाण्यात आणि अल्पावधीत हातात येणारे उन्हाळी मूग हे एकमेव पीक आहे. तसेच ऐन खरिपाच्या तोंडावर येत असल्यामूळे पुढील बी, भरणासाठी खुप मोठा आधार होतो. त्यामुळे उन्हाळी मूग ही आमच्यासाठी एक पतसंस्थाच आहे. फक्त किमान दहा हजार रुपयांचे पुढे प्रतिक्विंटल भाव मिळावा अशी अपेक्षा आहे.

**परशराम बाजड, ( युवा शेतकरी, नेतन्सा ता.रिसोड )**



# पारनेर येथे होणार सद्गुरू किसन बाबा चौरे यांचा पुण्यतिथी सोहळा संपन्न

## ढोलकी डफ तुणतुण्याच्या गजरात पारनेर शहरात फुलणार भक्तीचा मळा

आधुनिक केसरी न्यूज



**पारनेर :** सत्य अविनाश पारखपद समाज पारनेर आयोजित सालाबादाप्रमाणे प.पु. सद्गुरू आत्मज्ञानी गणपत बाबा चौरे यांचे ज्येष्ठ नातू व सद्गुरु ब्रह्मनिष्ठ हरिदास महाराज चौरे यांचे चिरंजीव परमपूज्य सद्गुरु किसन बाबा चौरे यांचा विसावा पुण्यतिथी सोहळा पारनेर जामगाव रोड येथील आत्मज्ञानी गणपत बाबा मठामध्ये रविवार रोजी संपन्न होत आहे. प.पु.स.किसनबाबा चौरे यांच्या निधनानंतर गुरुगादीचे पाईक ठरलेले प.पु.स.बबनदादा चौरे यांनी अध्यात्मिक सद्गुरु विचारांचा वारसा जतन करत महाराष्ट्रभर मोठ्या प्रमाणात शिष्य सांप्रदाय वाढवला आहे.सद्गुरु विचारांची देवाण-घेवाण होणाऱ्या पारनेर येथील या आत्मज्ञानी गणपत बाबा मठ या ठिकाणी सद्गुरु किसन बाबा चौरे यांचा पुण्यतिथी सोहळा भक्तिमय व मंगलमय वातावरणात करण्याचे आयोजन केलेले आहे.

प. पु .सद्गुरु किसन बाबा चौरे यांचे अध्यात्मिक अधिष्ठान हे वेगळ्या स्वरूपाचे होते. संसारिक जीवन जगत असताना गुरुज्ञानाचा अवलंब करून परमार्थिक सुख कशाप्रकारे अनुभवावे यासाठी सद्गुरुचा साधकाच्या जीवनात कशाप्रकारे लाभ होतो हे किसन बाबांनी आपल्या जीवनात दाखवून दिले आहे.आत्मज्ञानी गणपत बाबांच्या अध्यात्मिक कार्यात आपले आयुष्य घालवून योग साधनेतून आनंदी जीवन कसे जगावे त्या साठी जीवनात सद्गुरु पदाचे महत्त्व काय असते याची जाणीव आपल्या शिष्य मंडळांना पटवून दिली आहे. जातिभेद अंधश्रद्धा अनिष्ट चालीरीती मोडण्यासाठी त्यांनी आपल्या गुरुपदाचा वापर करून शिष्य गणांना परमार्थिक सुखाची प्राप्ती करून दिली. (अहमदनगर) अहिल्यानगर जिल्ह्यसह कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे या सह महाराष्ट्रात विविध ठिकाणी ढोलकी डफ तुनतुन्याच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन व समाज प्रबोधनपर कार्य करणारे हे सत्य अविनाश पारखपद समाज असून इतर जिल्ह्यातून हजारो भाविक भक्त हे पारनेर मध्ये या पुण्यतिथी सोहळ्या निमित्ताने एकत्र जमतात व पारनेरच्या बाजारपेठेतून सद्गुरु प्रतिमेची भव्य मिरवणूकीच्या माध्यमातून अध्यात्मिक भेदिक भजने व कलगी तुऱ्याचा सामना या लोककलेच्या माध्यमातून पारनेर शहरात पारनेरकरांना अनुभवयास मिळतो.व संपूर्ण पारनेर शहर हे भक्तीमय होऊन जाते. स. ८:३० सदगुरू समाधी पुजन होणार असुन स.९:३० वडगाव सावताळ मंदिरात श्री.दत्त सावताळांचे पुजन,स.१० ते ११:३० सावताळ मंदिरात अध्यात्मिक चर्चासत्र,दु.२ ते ३:३० एकतारी भजन, दु.३:३० ते ६:३० शाहिरी जल्लोषात व बाल लेझीम व हलगीच्या निनादात सद्गुरू प्रतीमांची मिरवणूक निघणार असून,सायं.७ वा.सद्गुरू पादुकांची महापुजा व तद्नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे .सायं. ९ ते पहाटेपर्यंत नामवंत शाहीरांचा भेदिक भजनाचा कार्यक्रम होणार आहे. आत्मज्ञानी गणपत बाबा मठ,जामगाव रोड,पारनेर येथे सदर कार्यक्रमास उपस्थित राहून परमार्थिक सुखाचा लाभ घ्यावा,असे आवाहन प.पू.सद्गुरु बबनदादा चौरे, ज्येष्ठ शाहीर निजामभाई शेख व समस्त सत्य अविनाश पारख पद समाज पारनेर यांच्या कडून करण्यात येत आहे.

# डॉ. आईंचवार, डॉ. पोटदुखे भाजपात

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** गोंडवाना विद्यापीठाचे माजी कुलगुरू, श्री कन्यका नागरी सहकारी बँकेचे विद्यमान अध्यक्ष आणि सरदार पटेल मेमोरियल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. प्राचार्य विजयराव आईंचवार तसेच, राजीव गांधी अभियांत्रिकी कॉलेज चंद्रपूरचे प्राचार्य डॉ. प्रवीण पोटदुखे यांनी बुधवार, 3 एप्रिल रोजी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाचे भाजपा, राष्ट्रवादी आणि शिवसेना, मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. सुधीर मुनगंटीवार यांची विकासात्मक दृष्टी आणि झंझावाती कार्यशैलीवर विश्वास ठेवून मागील चार-पाच दिवसात इतर पक्षांच्या हजारो कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला असून त्यामुळे भाजपाची चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील ताकद वाढली आहे. हॉटेल तिरुपती क्राऊन येथे आयोजित शैक्षणि संस्थांचे पदाधिकारी बैठकीत डॉ. आईंचवार व डॉ. पोटदुखे यांनी भाजपात प्रवेश घेतला. लोकसभा निवडणुकीत ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या विजयाकरीता पूर्ण शक्तिनिशी आपण प्रयत्न करणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

